cmyk

## संपादकीय

### भरकटत चाललेले भाजप नेते वास्तव स्विकारणार का?

महाविकास आघाडीने सेट केलेले नरेटीव (महाकथन) उधळून लावण्यात आपण अपयशी ठरलो आणि राज्यात लोकसभेची लढाई हरलो अशी कबुली अखेर भाजपच्या नेत्यांनी देण्यास सुरुवात केली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी ती सर्वात आधी दिली होती आणि पुढे विधानसभेला असे घडू नये म्हणून 'मला यातून मोकळे करा' म्हणजे पक्षकार्य करायला मी मोकळा असेन अशी दिल्लीतील नेत्यांना सूचनाही केली होती.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### आज जमा होणार पीएम किसानचा हप्ता

नवी दिल्लीः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी (१८ जून) पीएम किसान योजनेचा १७ वा हप्ता जारी करण्यात येणार आहे. वाराणसी येथील सभेतून देशातील ९.२६ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना जवळपास २० हजार कोटी रुपये वितरीत करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदी लोकसभा मतदारसंघ वाराणसी येथे कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. येथील शेतकरी सभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी संबोधित करणार आहेत. या प्रसंगीच पंतप्रधान मोदी केंद्र शासनाच्या पीएम किसान योजनेचा १७ वा हप्ता जमा करणार आहेत.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–६८ मंगळवार दि.१८ जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये


# शक्तिपीठ महामार्गाला राज्यातील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

## आज घेरा डालो डेरा डालो म्हणत शेतकरी एकवटणार, विराट महामोर्चाचे आयोजन

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**गोवा ते नागपूर ८०५ किमीचा शक्तिपीठ महामार्ग महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यातून जाणार आहे. यामध्ये हजारो हेक्टर शेतजमीन जाणार असल्याने अनेक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध करण्यास सुरूवात केली आहे. दरम्यान हा महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी शक्तिपीठ महामार्गविरोधी संघर्ष समितीच्या वतीने कोल्हापुरात मंगळवारी (दि.१८) जिल्हाधिकारी कार्यालयावर घेरा डालो डेरा डालो या बॅनरखाली महामोर्चा काढण्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चास अनेक पक्षाच्या नेत्यांनी पाठींबा दर्शवत हजारोंच्या संख्येने येण्याचे आवाहन केले आहे.**

महामार्गविरोध समितीचे समन्वयक गिरीष फोंडे म्हणाले की, सकाळी ११ वाजता शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने दसरा चौकात मोर्चात सहभागी व्हावे, समाजातील कोणत्याही घटकाची मागणी नसताना करण्यात येत असलेल्या नागपूर ते गोवा हा ८०५ किलोमीटर लांबीच्या शक्तिपीठ महामार्गाला शेतकऱ्यांचा कायम विरोध असणार आहे. भूसंपादनास आलेल्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी परत पाठविले आहे. हा महामार्ग रद्द व्हावा, यासाठी हा पान २ वर




### मुख्यमंत्र्यांनी शक्तिपीठ रद्दची घोषणा करावी

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा संबंधित मंत्री यांनी शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यात येत असल्याची घोषणा करणे आवश्यक आहे. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गाबद्दल इतर नेत्यांच्या घोषणांकडे दुर्लक्ष करून शेतकऱ्यांनी मोर्चात सहभागी व्हावे, असे शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीने कळविले आहे.

### महायुतीचे नेते एकवटले, मुख्यमंत्र्यांना निवेदन

राज्यातील शक्तिपीठांना जोडण्यासाठी गोवा ते नागपूर असा शक्तिपीठ महामार्ग बांधण्यासाठी अधिसूचना काढण्यात आल्याने शेतकऱ्यांनी याविरोधात संताप व्यक्त केला आहे. दरम्यान याविरोधात महाविकास आघाडीचे नेते पहिल्यापासून आक्रमक होत. कोल्हापूर जिल्ह्यातील महायुतीच्याही नेत्यांनी याला जोरदार विरोध दर्शवला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ, आमदार प्रकाश आबिटकर, माजी खासदार संजय मंडलिक, भाजप नेते समरजित घाटगे यांनी याबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले आहे.

# सरकारला लोकांच्या जगण्या मरण्याचे घेणे देणे नाही

**काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा हल्लाबोल**



**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर आहे. राज्याच्या विविध भागात उष्माघाताने अनेकांचा बळी गेला आहे. दुष्काळाने ग्रस्त शेतकरी आत्महत्या करत आहेत. पाण्यासाठी वणवण करताना अनेक माता भगिणींनी आणि लहान मुलामुलींनी जीव गमावला आहे. कंपन्यांमध्ये झालेल्या स्फोट आणि दुर्घटनेत अनेकांचा मृत्यू झाला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये राज्यात किड्या मुंग्याप्रमाणे माणसे मरत आहेत. पण राज्य सरकार मात्र फक्त टेंडर काढणे, निधी वाटणे आणि कमिशन घेणे यात मश्गूल आहे. सरकारला लोकांच्या जगण्या मरण्याचे काही घेणे देणे राहिले नाही, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

नागपूर येथे माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, जून महिना संपत आला तरी अद्याप राज्याच्या अनेक भागात पाऊस पडलेला नाही. जनता भयंकर दुष्काळाचा सामना करत आहे. लोकांना प्यायला पाणी नाही जनावरांना चारा नाही. राज्यात टँकर माफिया आणि बोगस बियाण्यांचा सुळसुळाट झाला आहे. राज्याच्या विविध भागांमध्ये उष्माघाताने अनेक लोकांचा मृत्यू झाला आहे. पण सरकार कुठे दिसत नाही. राज्य एवढ्या भयंकर परिस्थितीचा सामना करत असताना सत्ताधारी पक्षाचे मंत्री परदेशात जाऊन थंड हवा खात आहेत. राज्यात उष्माघाताने किती लोकांचा मृत्यू झाला आहे हे सरकारने जाहीर करावे. परदेशात जाण्यासाठी मंत्र्यांना केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागते या मंत्र्यांनी ती परवानगी घेतली आहे का? यांचा परदेश दौऱ्याचा खर्च कोण करत आहे? या प्रश्नांची उत्तरे सरकारने जनतेला दिली पाहिजे अशी मागणीही यावेळी केली. नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, मुख्यमंत्र्यांचा मंत्र्यांवर आणि प्रशासनावर पान २ वर

# पंकजा मुंडे वडीगोद्रीत ; प्रा.लक्ष्मण हाकेंच्या उपोषणाला दिली भेट



### लक्ष्मण हाके यांच्या मागण्या

- ओबीसी भटक्या विमुक्त जाती जमातीच्या मूळ आरक्षणात मराठा समाजाचा समावेश करू नये. तसे लेखी आश्वासन मुख्यमंत्री महोदयाकडून मिळाले पाहिजे.
- कुणबीच्या लाखो बोगस नोंदीची त्वरित दखल घेवून त्या रद्द कराव्यात.
- ओबीसींच्या आर्थिक विकास महामंडळाला आर्थिक तरतूद करावी.
- ओबीसीच्या वसतिगृहाची प्रत्येक जिल्हात योजना कार्यान्वित व्हावी.
- ओबीसीची जातनिहाय जनगणना व्हावी.
- मनोज जरांगे– पाटील यांना रेड कार्पेट

**जालना । प्रतिनिधी**

**भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज संध्याकाळी वडीगोद्री येथे ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची उपोषण स्थळी जावून भेट घेतली. उपोषणाचा आजचा पाचवा दिवस होता. दरम्यान वंचितांच्या लढ्यात मी या दोघांसोबत आहे. सरकारने सन्मानाने त्यांचे उपोषण सोडवून न्याय द्यावा अशी मागणी त्यांनी यावेळी केली.**

मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसीला धक्का लागणार नाही याची लेखी हमी सरकारने द्यावी या मागणीसाठी गेल्या चार दिवसांपासून लक्ष्मण हाके व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपोषण सुरू केले आहे. आज संध्याकाळी पंकजाताईंनी उपोषणाला भेट देऊन आपला पाठिंबा व्यक्त केला. यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, "दोन दिवस झाले मी अत्यंत विचित्र तीव्र दुःखी भावनांना सामोरे गेले आहे. मला भेटल्या भेटल्या लक्ष्मण पान २ वर

### ओबीसी समाजाच्या भावना ऐकून घेतल्या पाहिजेत

माझी मागणी सर्वात महत्त्वाची आहे. आज माझं म्हणणं सर्वांनी ऐकावं अशी विनंती आहे. आंदोलन देशात कुणीही करु शकतं. लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार आहे. या आंदोलनाला कायद्याच्या चौकटीत बसून न्याय देणं हे सरकारचं कर्तव्य आहे. मी कुठली प्रतिनिधी म्हणून येथे आलेले नाही. तर मला असं वाटलं की, इथेसुद्धा मोठ्या नेत्यांनी येऊन आंदोलकांच्या भावना ऐकून घेतल्या पाहिजेत आणि न्याय देण्याची भूमिका घेतली पाहिजे'', असंही पंकजाताई मुंडे पुढे म्हणाल्या.

### जरांगे पाटील यांना रेड कार्पेट, आमची साधी दखलही नाही – हाके

मराठा आंदोलक मनोज जरांगे– पाटील आंदोलन करतात. तेव्हा त्यांना रेड कार्पेट टाकले जाते. आम्ही उपोषण करतो, तेव्हा शासनाकडून आमची साधी दखलही घेतली जात नाही. हाच फुले, शाहू आणि आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे का? ओबीसींची अनेक आंदोलने झाली. सावित्रीमाई फुलेंच्या जन्मगावीही आंदोलन केले. त्यावेळी सरकारच्या स्थानिक प्रतिनिधींनीही या आंदोलनाची दखल घेतली नाही. चौंडी आणि भगवानगडाजवळही ओबीसींनी आंदोलन केले. त्याचीही सरकारने दखल घेतली नाही. हे सरकार ओबीसींचे नाही का? आमची लोकसंख्या ६० टक्के आहे. तरीही आमच्याकडे लक्ष दिले जात नाही. असे लक्ष्मण हाके म्हणाले.

### सरकारने या दोघांचंही उपोषण सन्मानाने सोडवावं

लक्ष्मण हाके यांनी आज पाणी सोडलं आहे. पण त्यांचे चेहरे टवटवीत आहे, कारण संघर्ष त्यांच्या पाचवीला पुजलेला आहे. डोंगर, कपाऱ्यात जाऊन जीवन जगणारा हा माझा वंचित समाज आहे. या समाजाचा काय आवाज आहे, तो आवाज सरकारने ऐकायलाच पाहिजे, अशी माझी मागणी आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना माझी विनंती आहे, ओबीसींच्या आरक्षणाला कसा धक्का लागणार नाही ते आम्हाला समजावून सांगा. मराठा आरक्षणाला आमचा विरोध असण्याचं कारणच नाही. पण चुकीच्या पद्धतीने सर्टिफिकेट दिले जात असतील तर ते मान्य नाही. सरकारने या दोन्ही जणांचे उपोषण सोडवण्यासाठी यावं. ज्याप्रकारे इतरांचं उपोषण सोडवलं जातं त्याच प्रमाणे सन्मानाने यांचं उपोषण सोडवलं जावं', असं आवाहनही पंकजाताई मुंडेंनी केलं आहे.

# कांचनगंगा एक्सप्रेस आणि मालगाडी धडकल्या

### ३० प्रवाशांचा मृत्यू, ६० जखमी

**कोलकाता । वृतसंस्था**

पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यात १७ जून रोजी सकाळी थांबलेल्या कांचनगंगा एक्सप्रेसला मागून येणाऱ्या मालगाडीने धडक दिली. त्यामुळे कांचन गंगा गाडीचे मागील तीन डब्बे रूळावरून घसरले. तर कांचनगंगा एक्सप्रेसमधील जवळपास ३० प्रवाशांचा मृत्यू तर ६० हून अधिक नागरिक जखमी झाल्याची माहिती समोर आली असून, मालगाडीचा लोको पायलट (चालक) कांगचनगंगा एक्सप्रेस गाडीचा लोका पायलट दोघेही ठार झाल्याची माहिती रेल्वे बोर्डाच्या संचालकांनी दिली.

त्रिपुरातील आगरतळाहून पश्चिम बंगालमधील सियालदहला जाणाऱ्या कांचनजंगा एक्स्प्रेसला काही अंतरावर थांबविण्यात आले. काही कालावधीनंतर त्याच मार्गावरून येत असलेल्या मालगाडीने कांचनगंगा एक्सप्रेसला धडक दिली. त्यामुळे मागील तीन डबे रुळावरून घसरल्याने किमान ३० प्रवाशांचा पान २ वर

### उष्णतेमुळे उत्तर प्रदेशमध्ये ३३ जणांचा मृत्यू

**लखनौ । वृतसंस्था**

उत्तर भारतात उष्णतेची लाट कायम आहे. तापमान दररोज रेकॉर्ड मोडत आहे. उत्तर भारत आणि दिल्लीतील अनेक भागात तापमान ५० अंशांच्या जवळ पोहोचले आहे. उत्तर प्रदेशमध्ये उष्णतेमुळे ३३ जणांचा मृत्यू झाला आहे. सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत घराबाहेर न पडण्याचा सल्ला डॉक्टर देत आहेत. पण काम करण्यासाठी मोठ्या लोकांना या कडक उन्हात घराबाहेर पडावे लागत आहे. देशाची राजधानी दिल्लीला देखील याचा फटका बसला आहे. जून सुरू झाल्यानंतर उत्तर भारतात सकाळपासूनच सूर्य सतत तळपत असतो. पूर्वी हे फक्त रेकॉर्ड तोडण्यापुरतच होते. पण आता सतत होत आहे. उत्तर प्रदेशमध्ये उष्णतेने ३३ हून अधिक लोकांचा बळी घेतला आहे. यामध्ये शनिवारी कानपूर आणि बुंदेलखंडमध्ये २० जणांचा मृत्यू झाला. कानपूरमध्ये ४६.३, हमीरपूर ४६.२, झाशी ४६.१, वाराणसी ४६, प्रयागराज ४६ आणि आग्रा येथे ४५.५ अंश तापमानाची नोंद झाली आहे.

# राहुल गांधी वायनाडची जागा सोडणार अन् प्रियांका पोटनिवडणूक लढवणार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी रायबरेली जागा कायम ठेवली असून, त्यांनी केरळमधील वायनाड जागेचा राजीनामा देणार आहेत. त्यामुळे आता वायनाड लोकसभा मतदारसंघातील फेर निवडणूक प्रियंका गांधी लढवणार असल्याचे निश्चित झाले आहे. सोमवारी (दि. १७) काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी याबाबत माहिती दिली.**



केंद्रात नवे सरकार स्थापन झाल्यानंतर २४ जूनपासून संसदेचे अधिवेशन सुरू होणार आहे. त्याआधी सोमवारी काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या घरी काँग्रेस नेत्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला काँग्रेस संसदीय पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१५ जून २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २.०० क्विंटल | २,३५१ | २,८०१ | २,५७६ |
| ज्वारी/हायब्रिड :१८.५० क्विंटल | २,१०० | २,४७० | २,३२० |
| मूग : ०.५० क्विंटल | ७,२३० | ७,२३० | ७,२३० |
| तूर : १.५० क्विंटल | ९,४०१ | ९,४०१ | ९,४०१ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ६.०० क्विंटल | २,३०० | २,५९० | २,४८४ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: २३.५० क्विंटल | ४,४२५ | ४,४५० | ४,४३७ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ४,२०० | ६,४५२ | ५,३२६ |

# जिल्ह्यासाठी ५४५ कोटी ४९ लाख रुपयांच्या निधी खर्चाचे नियोजन

## विकासासाठी सर्वांच्या सहकार्यातून योग्य नियोजन करू–धनंजय मुंडे

### बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक ना.मुंडेंच्या अध्यक्षतेखाली संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी ही लोकप्रतिनिधी म्हणून आपल्या सर्वांवरच आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सर्वच लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या सहकार्याने जिल्हा नियोजन समितीच्या निधी खर्चाचे सुयोग्य नियोजन केले जाईल असा विश्वास आज पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.**

ना. धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज बीड जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. यामध्ये सन २०२३ २४ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात आलेल्या निधीच्या अहवालास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी प्रशासनाने सुयोग्य नियोजन करून मागील वर्षीचा शंभर टक्के निधी पास प्रणालीवर खर्च केला त्यामुळे पालकमंत्री मुंडे साहेब सर्वच लोकप्रतिनिधी यांनी नियोजन विभागाचे व प्रशासनाचे अभिनंदन व कौतुक केले.

दरम्यान २०२४ – २५ साठी सुमारे



५४५ कोटी ४९ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आलेला असून, यामध्ये सर्वसाधारण योजनेसाठी ४१४ कोटी, अनुसूचित जाती योजना साठी १२९ कोटी, तर ओटीएसपी योजना साठी दोन कोटी ४९ लाख रुपये इतका निधी आरक्षित करण्यात आलेला आहे.

आज संपन्न झालेल्या बैठकीमध्ये जिल्हा नियोजन समितीच्या निधी खर्चाचे संपूर्ण नियोजन करण्याचे अधिकार सर्वानुमते पालकमंत्री धनंजय मुंडे यांना देण्यात आले यासंबंधीच्या ठराव आमदार प्रकाश दादा सोळंके व आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी मांडला व त्याला अन्य सर्वच लोकप्रतिनिधींनी अनुमोदन दिले. या बैठकीस खा. रजनीताई पाटील, खा. बजरंग सोनवणे, आ. प्रकाश दादा सोळंके, आ. सुरेश आण्णा धस, आ. बाळासाहेब काका आजबे, आ. संदीप क्षीरसागर त्याचबरोबर जिल्हाधिकारी दीपा मुधोळ–मुंडे, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांसह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी आदी उपस्थित होते. दरम्यान बैठकीच्या शेवटाकडे वळत असताना पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी शासन प्रशासना सर्वच लोकप्रतिनिधींचे सध्या जिल्ह्यात सुरू असलेल्या वातावरणाच्या संदर्भात लक्ष वेधले. निवडणूक संपली मात्र तरीही विविध पक्षाचे कार्यकर्ते किंवा अन्य काही समाजकंटक हे विशेष करून सोशल मीडिया वरून एखाद्या जाती धर्म किंवा राजकीय नेत्यांच्या संदर्भात द्वेष, अफवा व विष पेरणाऱ्या पोस्ट व्हायरल करत असून त्यामुळे जातीय सलोखा बिघडवण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे सर्वच लोकप्रतिनिधींनी याबाबत जनजागृती करण्याचे तसेच शांततेचे आवाहन करण्याची आवश्यकता आहे. कुठल्याही जाती धर्मातील किंवा कोणत्याही पक्षाचे अनुयायी असलेले अगदी कोवळ्या वयातील तरुण या विखारी प्रचाराला बळी पडत असून त्यांच्यावर पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# भरकटत चाललेले भाजप नेते वास्तव स्विकारणार का?

महाविकास आघाडीने सेट केलेले नरेटीव (महाकथन) उधळून लावण्यात आपण अपयशी ठरलो आणि राज्यात लोकसभेची लढाई हरलो अशी कबुली अखेर भाजपच्या नेत्यांनी देण्यास सुरुवात केली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी ती सर्वात आधी दिली होती आणि पुढे विधानसभेला असे घडू नये म्हणून 'मला यातून मोकळे करा' म्हणजे पक्षकार्य करायला मी मोकळा असेन अशी दिल्लीतील नेत्यांना सूचनाही केली होती. आता हळूहळू चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांतदादा पाटील यांनीही सूर बदलून तसलेच गाणे सुरू केले आहे. हरल्याची ही कबुली आणि येत्या विधानसभा निवडणुकांमध्ये जिंकण्याचा निर्धार त्यांच्या पक्ष कार्यकर्ता संमेलनात आवश्यक होता. पण येथे कार्यकर्त्यांचे किती ऐकून घेतले आणि खेळणे समजून त्यांनाच पुन्हा कशी चावी देण्याचा प्रयत्न झाला ते दिसत आहेच. इतके धक्के बसूनही भाजप संघटनेचे पदाधिकारी असलेले नेते वास्तवाच्या बाबतीत मात्र उदासीनच राहत आहेत.

आपले फसलेले नरेटीव पुन्हा रेटण्यावर भाजप प्रदेशाध्यक्षांचाच भर दिसतो. कदाचित त्यांच्याकडून अद्याप उघडपणे कोणी राजीनामा मागितला नसल्याने त्यांची ही बडबड असावी. वक्फ बोर्डाच्या जमिनी मूळ मालकांना परत मिळाव्यात या आणि अशाच वादग्रस्त आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रत्यक्ष प्रश्नांपासून खूप दूर असणाऱ्या मुद्द्यांवर बावनकुळे आज सुद्धा बोलत आहेत. कार्यकर्त्यांना भरकटवत आहेत. दहा वर्षे केंद्रात आणि सातवर्षे राज्यात सत्तेवर असताना जे काम हाती घेतले नाही ते निवडणुकीनंतर करण्यासाठी सत्ता मागण्या इतकेच हे हास्यास्पद आहे. त्याचा परिणाम त्यांच्या पक्षाच्या विरोधात विरोध एकवटण्यावर होत आहे, याची त्यांना फिकीर नसावी. भाजपला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आरसा दाखवला असला तरी त्याचा परिणाम पक्ष पदाधिकाऱ्यांवर झाला नसावा. एकीकडे राष्ट्रवादीचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाशिक, नगर, पुणे, सोलापूर पट्ट्यातल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या संतापाकडे दुर्लक्ष केल्यामुळे आणि ग्राहक व शेतकरी यांच्या हिताचा ताळमेळ साधण्याची केंद्र सरकारकडे मागणी करूनही दुर्लक्ष झाल्यामुळे फटका बसल्याचे अर्थातच पराभव झाल्याचे मान्य केले गेले आहे. भाजपचा आणखी एक मित्रपक्ष शिवसेना. दस्तुरखुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राज्यातील सर्वच विभागातील शेतकऱ्यांना आपण नाराज केले आहे, याची जाणीव आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात महायुतीचा झालेला दाऊण पराभव त्यांनी राष्ट्रीय कृषिमूल्य आयोगाच्या बैठकीत मान्य केला. भाजपचे शेतकरी नेते पाशा पटेल सध्या राज्याच्या कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्याच पुढाकाराने राष्ट्रीय कृषी मूल्य आयोगाची बैठक अध्यक्ष आलोक शर्मा यांच्या उपस्थितीत मुंबईत झाली. या बैठकीला उपस्थित राहून मार्गदर्शन करणारे एकनाथ शिंदे हे पहिले मुख्यमंत्री ठरले. या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी, कृषीमूल्य आयोगाने शेतकऱ्यांचा विचार करून सोयाबीन, कांदा उत्पादकांचा रोष कसा निर्माण झाला यावर भाष्य केले. शेतकऱ्यांना एमएसपी, मिलेट्सना सुद्धा चांगला भाव मिळाला पाहिजे यासाठी कृषिमूल्य आयोगाने प्रयत्न करावेत अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे झालेल्या दुर्लक्षाला त्यांनी सुद्धा प्राधान्य दिले. मात्र राज्यातील प्रमुख पक्ष असणाऱ्या भाजपचा अजेंडा मात्र या लोकाभिमुख मुद्द्यांपासून दूरच कुठेतरी भरकटत चालला आहे. हे भरकटणे पक्ष म्हणून सुद्धा योग्य नाही आणि देशातील सत्ताधारी म्हणून सुद्धा योग्य नाही.

राज्यात डबल इंजिनचे सरकार पुन्हा सत्तेवर आले पाहिजे. अन्यथा महाविकास आघाडीचे सरकार केंद्राच्या महत्त्वाकांक्षी योजना राज्यात राबवणार नाही आणि त्यामुळे जनतेचे नुकसान होईल, अशी भीती बावनकुळे यांनी घातली. ते एखाद्या वेळी योग्य म्हणता येईल. या कथानकाला काही आधार आहे आणि त्यात जनतेच्या हिताची चिंता तरी दिसते. पण या बैठकीमध्ये कार्यकर्त्यांच्या मनात काय खदखद सुरू आहे, तीही जाणून घेण्याची गरज होती. भाजपचे कार्यकर्ते घरोघर का पोहोचले नाहीत, संघाच्या स्वयंसेवकांनी प्रचारापासून स्वत:ला अलिप्त का ठेवले? इतकी कुरघोडी तिन्ही पक्षात झाली, ती कोणत्या कारणांमुळे झाली आणि यापुढे तरी ती थांबणार आहे का? या दृष्टीने कार्यकर्त्यांच्या मनातील खदखद व्यक्त करायला पक्ष पदाधिकाऱ्यांनी वाव ठेवला नाही हे दुर्दैवच. ही खदखद मनात घेऊन ते पुन्हा निवडणुकीला सामोरे जाणार आहेत म्हणजे आपापल्या गावागावात ते नेमके करणार काय आहेत? एकदा अपयश आले की त्याचे खापर दुसऱ्याच्या डोक्यात फोडण्यासाठी नेते कारण शोधत असताना कार्यकर्त्यांसमोर लढाई आहे. ठाकरे, पवार आणि पृथ्वीराज चव्हाण यांनी एकत्र येऊन राज्यात पुन्हा महाविकास आघाडी एक दिलाने विधानसभेला लढून यश मिळवेल असा विश्वास व्यक्त केला आहे. महाआघाडीतील प्रत्येक नेत्यांनी स्वबळावर लढण्याची चाचपणी सुरू केल्याने आता हे पक्षही विखुरणार असे वातावरण निर्माण झाले होते. पण, तातडीने सावरत त्यांनी आम्ही एकत्र लढणार असा निर्धार व्यक्त केला आहे.

पावणेदोनशे विधानसभा मतदारसंघात महायुतीची लोकसभेला पीछेहाट झालेली आहे. आणि विरोधी मतदानाचे मुद्दे अधिक बळकट आहेत. अशा स्थितीत नकारात्मकते ऐवजी सकारात्मक प्रचार आणि त्याद्वारे जिंकण्याचा मानस लोकांच्या समोर मांडणे अपेक्षित होते. हे काम महाविकास आघाडीने चांगल्या पद्धतीने केले. पण, भाजप नेतृत्व अजूनही चुकीच्या मुद्द्यांना कवटाळून बसले आहे. आपण म्हणतो तेच खरे होईल अशी वाट पाहत बसणे लोकसभा निवडणुकीत महागात पडले आहे. अशावेळी भाजपचे नेते ज्या प्रकारची वक्तव्ये करत आहेत, त्यातून लोकांच्या मनात कोणती भावना निर्माण होणार हे सर्वश्रुत आहे. तरीही तोच खेळ करत बसण्यात ते वेळ घालवत आहेत.




## संविधान संवाद समिती महाराष्ट्र ने केली शाहू जयंतीची सुरुवात!

कोल्हापूर । प्रतिनिधी

लोकराजा शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीच्या निमित्ताने चला संविधान समजून घेऊया ही दोन दिवसीय संविधान संवाद निवासी शिबीर पार पाडले.महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणाहून ३८ युवा लोकराजा शाहूंची कर्मभूमी असलेल्या राधानगरी मध्ये आले होते.

संविधान संवाद समिती महाराष्ट्र चे कोल्हापूर जिल्हा कार्याध्यक्ष संघसेन जगतकर, जिल्हा सचिव अमोल नंदा पाटील सर्जेराव,विभावी आढाव, अंशुमन सुळगावकर यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली या शिबिराचे संयोजन झाले. अमोल पाटील, राजवैभव शोभा रामचंद्र, राज्य कार्यकारणी सदस्य संजय रेंदाळकर, राज्य कार्याध्यक्ष सुनील स्वामी यांनी संवादक म्हणून जबाबदारी पार पाडली. राज्य कार्यकारणी सदस्य रेशमा खाडे,हार्षल जाधव, रोहित वनिता गजानन दळवी यांनी विशेष कष्ट घेतले. पुणे जिल्हा शाखेच्या सचिव शितल यशोधरा यांनी शिबिरात सहभाग नोंदवला. संविधान संवाद, शाहू विचार दर्शन मॉर्निंग ट्रेक, विविध गाणी, ऍक्टिव्हिटी, घोषणा, शाहू- बाबासाहेब पुतळ्यांना अभिवादन आदी गोष्टींनी हे शिबीर बहरलेले होते. राधानगरी मध्ये वारंवार अशी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. शाहू विचार, संविधान विचार राधानगरी मधून फक्त जिवंत नव्हे तर राधानगरी विचारांचे केंद्र बनवणे हे आमचं उद्दिष्ट आहे. संविधान संवाद समिती महाराष्ट्र या संघटनेत सहभागी होऊन आपणही संविधान संवादक होऊ शकता. आपले सहर्ष स्वागत आहे. सहभागी होण्यासाठी संपर्क करा- ९४२११४८७९

**परळी शहरातील तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आयोजित सन्मान कर्तूत्वाचा गौरव गुणवत्तेचा कार्यक्रम संपन्न**

## प्रा.नागेश जोंधळे यांचे १० वी १२ वी नंतर करियर घडवण्याच्या संधी या विषयावर सखोल मार्गदर्शन



परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा आयोजित सन्मान कर्तुत्वाचा गौरव गुणवत्तेचा हा कार्यक्रम संपन्न झाला असून या कार्यक्रमात या उपक्रमाबद्दल बाळासाहेब जगतकर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या असल्याची माहिती ही देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी शहरातील तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व साप्ताहिक मानपत्र च्या वतीने भीमनगर, साठेनगर, रमानगर व प्रबुद्ध नगर येथील दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा व विशेष प्राविण्य मिळविलेल्या व्यक्तींचा तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने सत्कार व दहावी बारावी नंतर काय या विषयावर विशेष मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रज्ञा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अँड.अनंतराव जगतकर तर प्रमुख उपस्थिती बीड येथील देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे तर आई सेंटरचे संचालक प्रा.नागेश जोंधळे व्याख्यान ,प्रमुख पाहुणे म्हणून परळी शहरातील नामवंत युवा उद्योजक व्ही.के.कलर होम चे संचालक,विनोद कांबळे तर विशेष निमंत्रित म्हणून मुंबई रेल्वे मेट्रोचे व्यवस्थापक राजू श्रावणराव जगतकर, गंगाखेड येथील सुप्रसिद्ध डॉक्टर तथा राजश्री हॉस्पिटलचे संचालक डॉ. गुणवंत जगतकर विधीतज्ञ अँड.दिलीप उजगरे प्रा. विलास रोडे राज्यस्तरीय क्रीडा शिक्षक आदर्श पुरस्कार करते परभणी लोहगावचे नरसिंह कॉलेजचे शिक्षक शेख सर नरसिंह कॉलेज लोहगावच्या डॉ.प्रा. यशश्री जगतकर औरंगाबाद हायकोर्टाच्या वकील अँड.ऐश्वर्या पवार / बनसोडे न्यूज महाराष्ट्र वन चे संपादक श्री खांडेकर आदी उपस्थित होत्या तर विशेष मार्गदर्शक म्हणून आई सेंटरचे संचालक प्रा. नागेश जोंधळे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केलं असून विद्यार्थ्यांनी काय करावं याविषयी सखोल मार्गदर्शन केले आहे. या कार्यक्रमात दहावी बारावी व विशेष प्राधान्य मिळवलेल्या व शेतकरी कुटुंबातील अनिशा विलास आदोडे हिने नीट परीक्षेत सातशे पैकी ५८२ गुण घेऊन तर अँड.संजय जगतकर यांच्या मुलीचा कॅनडा येथे मानसशास्त्र या विषया वर निवड झाल्याबद्दल हृदय सत्कार करण्यात आला असून यात एकूण ५१ विद्यार्थ्यांचा शाल श्रीफळ समृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सहकुटुंब सहपरिवार सत्कार करण्यात आला या कार्यक्रमास भीम नगर साठे नगर रमा नगर प्रबुद्ध नगर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल आयोजक बाळासाहेब जगतकर यांचे कौतुक करण्यात आले असून यांना पुढील कार्यास खूप खूप शुभेच्छा दिल्या असल्याची माहिती ही प्रसिद्धी पत्रकार द्वारे देण्यात आली आहे. या कार्यक्रमास प्रा. संघपाल समुद्रे, सोपानराव ताटे, अँड.संजय जगतकर, प्रा.बालाजी जगतकर, मिथुन रोडे,प्रा.महादेव हावळे, महादू रोडे, अशोक तरकसे, अशोक जगतकर, राज जगतकर, सिद्धार्थ जगतकर, उत्तम समुद्रे, संजय शिंदे, दशरथ जगतकर, राहुल जगतकर, रावसाहेब जगतकर, कपिल ताटे, चेतन ताटे, किरण कांबळे, रमेश तायडे,विशाल बनसोडे, मनोज कांबळे, रमेश जगतकर, धम्मा अवचारे, राम हावळे, समाधान भिसे, दौलत हनवते, सारनाथ जगतकर, बंडू इंगळे, विवेक बनसोडे, इत्यादी सह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य आनंद तूपसमुद्रे यांनी प्रस्ताविक वंचित बहुजन युवा आघाडीचे परळी शहराध्यक्ष तथा तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष प्रेम जगतकर यांनी तर आभार तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संचालिका डॉ.प्रा.यशस्वी जगतकर यांनी मानले.

## धोंडराई माध्यमिक विद्यालयात मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप

गेवराई । प्रतिनिधी

**जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित माध्यमिक विद्यालय, धोंडराई ता.गेवराई येथे सन – २०२४ – २५ या शैक्षणिक सत्रासाठी आयोजित प्रवेशोत्सव सोहळ्याचे औचित्य साधून शनिवार दि.१५ जुन रोजी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅगसह आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.**



जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री शिवाजीराव( दादा) पंडित, संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, सचिव जयसिंग पंडित, माजी जि.प.अध्यक्ष विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली व शारदा स्पोर्ट्स अॅकडमीचे अध्यक्ष तथा युवा नेते रणवीर पंडित यांच्या प्रेरणेने शाळेत नेहमीच वेगवेगळे शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रम राबविले जातात. दरम्यान सन- २०२४ – २५ या शैक्षणिक वर्षाचे सत्र सुरु झाले असून यानिमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग सह शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बागपिंपळगाव केंद्राचे केंद्रप्रमुख नामदेवराव शिंदे, जि.प.मा.शाळेचे मुख्याध्यापक शहाणे, अरुण खरात, शाळेचे मुख्याध्यापक भक्तराज पौळ यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कै.श्रीहरी ठोसर यांच्या ३२ व्या पुण्यस्मरणार्थ वृक्षारोपण

बीड । प्रतिनिधी

**कै श्रीहरी आप्पाराव ठोसर यांचे काल ३२ वे पुण्यस्मरण होते त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त शिवसंग्राम महिला आघाडीच्या वतीने बीड शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण व विविध उपक्रम राबवून कै श्रीहरी आप्पाराव ठोसर यांचे पुण्यस्मरण साजरे केले.**





काल शिवसंग्राम महिला आघाडीच्या शहर उपाध्यक्षा सौ. संगीता हरिश्चंद्र ठोसर यांचे सासरे कै.श्रीहरी आप्पाराव ठोसर यांचे ३२ वे पुण्यस्मरण होते. त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त शिवसंग्राम महिला आघाडीच्या वतीने बीड शहरातील शाहूनगर भागातील माळे गल्ली च्या बाजूला असलेल्या पांडुरंग रेसिडेन्सी येथील वार्डक्रमांक १ मध्ये वृक्षारोपण केले. यावेळी कै. श्रीहरी आप्पाराव ठोसर यांच्या विविध आठवणींना उजाळा देऊन त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी शिवसंग्रामच्या महिला आघाडीच्या शहर उपाध्यक्षा सौ. संगीता हरिश्चंद्र ठोसर यांच्यासह सौ. अश्विनी कचरू चांभारे, सौ. सारिका दत्तात्रेय भगत, सौ. सुनीता संतोष जोगदंड, सौ. वर्षा शिंदे मंगल प्रताप, सौ जोशना भोरे यांच्यासह सर्व महिला पदाधिकारी व शिवसंग्राम चे कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान १वरून...

### शक्तिपीठ महामार्गाला राज्यातील

महामोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चाची गेल्या काही दिवसांपासून तयारी सुरू आहे. त्याच्यासाठी शक्तिपीठ महामार्ग जात असलेल्या गावांमध्ये सभा, बैठका घेण्यात आल्या आहेत. या बैठकांमध्ये महामार्गामुळे शेतकरी देशोधडीला लागणार असल्याचा आरोप करून हा महामार्ग रद्द करावा, अशी मागणी करण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील काही नेत्यांकडून शक्तिपीठ महामार्ग रद्द होणार आहे, रद्द करणारच, अशा घोषणा सोशल मीडियाद्वारे करण्यात येत आहेत. या घोषणांचे स्वागत आम्ही करत असलो तरी शक्तिपीठ महामार्गाबद्दल मुख्यमंत्री किंवा संबंधित मंत्र्यांनी कोणतीच प्रतिक्रिया अद्याप दिलेली नाही. त्यामुळे कोल्हापुरातील नेत्यांच्या अशा घोषणा व विधानांना जास्त महत्त्व देऊ नये असे गिरीष फोंडे म्हणाले. कोल्हापूर जिल्ह्यातून सुमारे १ हजार २०० हेक्टर जमीन या महामार्गासाठी जाणार असल्याने जिल्ह्यातील अनेक शेतकरी अल्पभूधारक होणार आहेत. या शेतकऱ्यांच्या अल्प प्रमाणात असणाऱ्या जमिनी शक्तिपीठ महामार्गामध्ये गेल्यास शेतकऱ्यांना उपजिवीकेसाठी जमिन शिल्लक राहणार नाही, त्यामुळे शेकऱ्यांमध्ये या शक्तिपीठ महामार्गा प्रचंड विरोध दर्शविण्यात येत आहे.

----------

### पंकजा मुंडे वडीगोद्रीत

दादा रडायला लागले. ताई, तुमच्या पराभवामुळे चार लोकांनी आत्महत्या केल्या, मला बघून रडू येतंय. परिस्थिती हाताळत असल्याने याला कोणतंही राजकीय वळण लागू नये. इथे मी यासाठी आले आहे की फक्त वंचित लोकांसाठी लढणाऱ्या माझ्या भावांकडे जाऊन त्यांचं म्हणणं काय आहे ते ऐकते आणि ते सरकारसमोर मांडण्याचा शब्द देते. धनंजय भाऊ कृषी मंत्री आहेत, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहे. त्यामुळे सरकारला तिथे जाऊन सांगण्याची गरज नाही. सरकारच इथे आहे, मी त्यांना इथंच सांगते.

-------

### सरकारला लोकांच्या जगण्या

वचक राहिलेला नाही. लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुतीच्या दारुण पराभवानंतर आपण पुन्हा सत्तेत येणार नाही. याची जाणिव झाल्यामुळे सरकारमधले लोक फक्त टेंडर काढणे, निधी वाटणे आणि कमिशन घेणे एवढे एकच काम करत आहेत. त्यांना जनतेच्या जगण्या मरण्याशी काही देणे घेणे राहिले नाही. नीट परीक्षेतील पेपरफुटीमुळे आणि निकालातील गोंधळामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे. ठिकठिकाणी विद्यार्थी आंदोलन करत आहेत पण सरकारने अद्याप या गोष्टींची दखल घेतली नाही. राज्यातही प्रत्येक भरती परीक्षेचे पेपर फोडले जातात. बेरोजगार तरुण या गैरप्रकारांमुळे निराश झाले आहेत. काँग्रेस पक्ष आगामी अधिवेशनात या सर्व मुद्द्यांवर सरकारला धारेवर धरून जाब विचारणार असल्याचा इशाराही यावेळी दिला. पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा कोणताही फॉम्युला ठरलेला नाही. लवकरच महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांचे नेते एकत्र बसतील आणि विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत चर्चा होईल त्यानंतर एकत्रीत बसून मेरीटनुसार जागावाटपाचा फॉर्म्युला ठरवू.

-----------

### राहुल गांधी वायनाडची जागा सोडणार

पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, खासदार राहुल गांधी, सरचिटणीस प्रियांका गांधी आणि केसी वेणुगोपाल उपस्थित होते. यामध्ये लोकसभा अध्यक्ष आणि उपसभापती निवडीबाबत चर्चा झाल्याचे समजते आहे. दरम्यान, वायनाड आणि रायबरेलीचे खासदार राहुल गांधी यांच्या एका जागेवरही निर्णय घेण्यात आला. ज्यात रायबरेलीची जागा कायम ठेवून वायनाडच्या जागेचा राजीमाना देण्याचे निश्चित झाले. याबाबत पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. यासोबतच प्रियांका गांधी केरळच्या वायनाड मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

----------

### कांचनगंगा एक्सप्रेस

मृत्यू झाला आणि ६० जण जखमी झाले. उत्तर बंगालच्या न्यू जलपाईगुडी स्थानकापासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या रंगपानी स्थानकाजवळ मालगाडीच्या लोकोमोटिव्हने मागून दिलेल्या धडकेमुळे हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. या अपघातातील मृतांची सख्या वाढू शकते असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

---------

### जिल्ह्यासाठी ५४५ कोटी ४९ लाख

दाखल होत असलेल्या गुन्ह्यांमुळे त्यांचे भवितव्य सुद्धा अंधारात येत आहे. त्यामुळे आता निवडणुकीच्या आणि राजकारण व समाजकारणाच्या पलीकडे जाऊन जिल्ह्यामध्ये शांतता आणि सलोखा प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनीच पुढाकार घेण्याची गरज असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. यावेळी अशा पोस्ट जाणीवपूर्वक पसरवणाऱ्या विरोधात सक्तीने कडक कारवाया केल्या जाव्यात, अशा सूचनाही धनंजय मुंडे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक व सायबर विभागाला केल्या आहेत.

## ओबीसी आरक्षणाला धक्का न लावण्याचे लेखी आश्वासन द्या-लक्ष्मण हाके

**वडीगोद्री येथे शिष्टमंडळाने घेतली भेट, तोडगा मात्र नाही**

जालना । प्रतिनिधी

**अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथील ओबीसी बचाव आंदोलनाचा सोमवारचा पाचवा दिवस होता. सरकारच्या शिष्टमंडळाने उपोषणस्थळी जाऊन भेट घेत त्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, सरकारच्या शिष्टमंडळाचे प्रयत्न अयशस्वी झाले.**




सरकारच्या वतीने सहकार मंत्री व जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, खा. संदीपान भुमरे, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड यांचा या शिष्टमंडळात समावेश होता. या शिष्टमंडळाने उपोषणकर्ते, लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्याशी चर्चा केली. तसेच उपोषण सोडून मुंबईला बैठकीला चर्चेसाठी येण्याचा आग्रह केला. तब्येत खालवल्याने किमान उपचार आणि पाणी घेण्याची विनंती केली. परंतु, जोपर्यंत राज्य सरकार आम्हाला ओबीसी आरक्षणाला धक्का न लागण्याचे लेखी आश्वासन देणार नाही, तोपर्यंत उपोषण कायम ठेवून उपचार पाणी घेणार नसल्याचा इशारा सरकारला दिला. आम्ही उपोषण सोडणार नाही, परंतु सरकारशी चर्चा करण्यासाठी आमच्या वतीने पाच जणांचे शिष्टमंडळ पाठवून शिष्टमंडळाची सकारात्मक चर्चा झाली आणि सरकारने लेखी आश्वासन दिले. तरच आम्ही उपोषण मागे घेवू, असेही लक्ष्मण हाके म्हणाले. मंत्रिमंडळ बैठकीत हाके यांच्या मागण्यांबाबत चर्चा करू, असे आश्वासन शिष्टमंडळातील सदस्यांनी दिले.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि.१८ जून २०२४


## उंच ध्येय गाठण्यासाठी मोठी स्वप्न पहा आणि जिवतोड मेहनत करा -प्रा.नाना महाराज कदम

**बीड । प्रतिनिधी**

उंच ध्येय गाठण्यासाठी मोठी स्वप्न पहा आणि जितोड मेहनत करा. यश मिळवण्यासाठी उत्तम मार्गदर्शक आणि कठीण परिश्रम मेहनत आवश्यक असते. असे प्रतिपादन श्री ह भ प प्रा.नाना महाराज कदम यांनी केले. बीड तालुक्यातील आंबिलवडगाव येथे गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती माझी न्यायमूर्ती बिपिन मंत्री , संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ मनोहर तांदळे, कृषी विद्यापीठ परभणीचे शास्त्रज्ञ डॉ संदीप पायाळ, सुरेश महाराज जाधव, सरपंचपती चंद्रसेन कीलमिसे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रसाळ सर, छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र खेडकर यांच्या सह सर्व शिक्षक वृंद यांची उपस्थिती होती.

# ऑनलाईन कपडे खरेदी,रेडीमेड कपड्यांमुळे पारंपरिक शिवणकाम करणारे टेलरिंग व्यवसाय अडचणीत

### टेलरिंग शिवणकाम व्यवसाय अडचणीत आल्याने युवा पिढी टेलरिंग व्यवसायापासून दुरच

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

एकेकाळी शिवणकाम करण्यासाठी टेलरिंगच्या व्यवसायाकडे युवकांचा कल होता. तो आता बोटावर मोजता येईल इतपत कमी झाला आहे.नव्हे या व्यवसायापासून युवा पिढी दूर जात असल्याचे चित्र आहे.रेडिमेड, ऑनलाइन कपडे घरपोच सेवा, शिवणकाम दरवाढ अशा अनेक कारणांमुळे शिवणकाम करणारा टेलरिंगचा व्यवसाय अडचणीत आला आहे.ग्रामीण ते शहरी भागात एकेकाळी नावाजलेले शिवणकाम करणारे टेलर्स म्हणून चर्चेत गणले जात होते. त्या चर्चा आता कालबाह्य होत आहेत.

जुन्या पिढीतील टेलर्स पडद्याआड गेले आहेत.१० वर्षांपूर्वी युवा पिढीतील टेलर्स निर्माण झाले.पुर्वी ग्रामीण भागात शिवणकाम करणार्या जुन्या पिढीतील टेलरच्या हाताखाली विनामोबदला शिवणकाम करण्याचे प्रशिक्षण घेतले जात असे. काच बटन सुरुवातीपासून, लावण्याच्या तर कापड कापण्यापर्यंत असे हे प्रशिक्षण होते. नंतर प्रशिक्षण घेतल्यानंतर युवा पिढीतील तरुणांनी स्वतःचे दुकान थाटले.ही पिढी आता प्रशिक्षण घेणारी अखेरची पिढी असल्याची दिसून येत आहे. सुरुवातीला भरभराटीला आलेला हा व्यवसाय ऑनलाइन व रेडिमेड कापडे आल्याने अडचणीत आले आहे. लहानापासून वयोवृद्धांपर्यंत कपडे शिवले जात होते. बहुतांश आता रेडिमेड कापडाची मागणी वाढली आहे.कापड शिवणकाम करण्यासाठी लागणार्या साहित्यात दरवाढ झाली, शिवणकामचे दर वाढले,स्वस्त दरात कापड उपलब्ध होत असल्याने ऑनलाइन व रेडिमेड कापडाचे मागणीकडे कल वाढला आहे. राज्य सरकार कलावंत,वृद्ध व अन्य गरजवंताना मासिक मानधन देत आहे.परंतु, टेलर्सचा कधी विचारच करीत नाही.टेलर्सना मासिक मानधन लागू केले पाहिजे. उतार वयात मोठा आधार मिळेल असे आहवान एका वयोवृद्ध टेलरिंग शिवणकाम करणाऱ्यां व्यक्तीने दै राज्य लोकतंत्रच्या प्रतिनिधी बोलताना सांगितले. आज शिवणकाम शिकणे म्हणजे कमीपणाचे लक्षण वाटू लागल्याने त्याकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे.टेलरिंगच्या व्यवसायात आज मराठी माणूस जेमतेम औषधाला सापडेल अशी अवस्था आहे. एकेकाळी शर्ट साडेतीन,तर पँट दहा ते पंधरा रुपयांत शिवून मिळत होती.परंतु, आज तो शर्ट दोनशे ते तीनशे रुपये,तर पँट तीनशे ते साडेचारशे रुपयांना शिवून मिळत आहे. महागाईमुळे शिलाईचे दरही वाढले आहेत. त्यामुळेच गेल्या दहा वर्षांत तयार कपड्याचा व्यवसाय तेजीत आला आहे. परिणामी आज कपडे शिवण्याचा कलही कमी झाला आहे.



रेडिमेडचा जमाना असला तरी नेहमीचे ग्राहक जुन्या टेलर मास्टरची गुणवत्ता पाहून त्यांच्याकडे येतात.परंतु ते कधी मिळतील याची तारीख सांगता येत नाही.रेडिमेड कपड्यांच्या कारखान्यांमध्ये एक शर्ट किंवा पँट शिवण्यासाठी सात ते आठ कामगारांचा हातभार लागत असतो. कॉलरमेकर, कफमेकर, कफ अटेचर आदी वेगवेगळे कामगार असतात. एका मापाचे हजारो शर्ट, पँट ते तयार करीत असतात. परंतु स्पेशल टेलरकडे एक कारागीर पूर्ण शर्ट आणि पँट शिवतो. त्यामुळे फिटिंगच्या बाबतीत कुठेही तक्रार येत नाही. परंतु आता या व्यवसायात फारसा फायदा मिळत नाही.

#### महागाई,फॅशन, कारागिरांच्या अडचणींमुळे अनेक व्यवसाय बंद

काही व्यावसायिकांनी आपले व्यवसाय बंद केले आहेत. तसेच शिवणकला शिकण्यास सहसा कोणी तयार होत नाही.परिणामी कारागीर मिळणेही बंद झाले आहे.कॅन्हॉस, बटने, अस्तर,सुई,धागा आदी साहित्यांच्या दरात वाढ झाल्याने शिलाईचे दर वाढले आहेत.पूर्वीपासून कपडे शिवून घेणारे ग्राहक नेहमीच्या टेलरकडे येतात. परंतु त्यांची मुले फॅशनेबल रेडिमेड कपडे वापरत असल्यामुळे या व्यवसायावर परिणाम झाला आहे. त्यातच हल्ली विद्यार्थ्यांचा गणवेश ठराविक दुकानातून घेण्याचा आग्रह शाळांनी धरल्यामुळे त्याचा परिणामही टेलरिंग व्यवसायावर झाला आहे.

प्रत्येक कुटुंबाला जसा फॅमिली डॉक्टर असतो तसा फॅमिली टेलरही असतो. व्यावसायिकदृष्ट्या डॉक्टरांना चांगले दिवस आले असले, तरी टेलरिंग व्यावसायिक मात्र गेल्या काही वर्षांपासून चिंताग्रस्त बनला आहे.रेडिमेड कपड्यांच्या जमान्यात टेलरिंग व्यवसाय डबघाईला आल्याने पारंपरिक व्यावसायिक विवंचनेत सापडले आहेत

–नवनाथ घायतीडक,टेलर –माजलगाव

अचूक मापाचे हवेतसे मनपसंद कपडे शिवायची आवड निराळीच होती.तसेच जशी नवी फॅशन येईल त्यानुसार कपडे शिवले जायचे.मात्र आता काळ बदलला आहे.ग्रामीण भागात टेलरिंग व्यवसाय अडचणीत आला आहे.

महादेव काळे,टेलर–शेलापुरी

एकेकाळी शिवणकला घराघरात शिकली जायची.मुलींनी शिवणकलेचे शिक्षण घ्यावे,असा त्यांच्या आईवडिलांचा आग्रह असायचा. उपजीविकेचा कोणताच पर्याय नसेल तर शिवणकाम करणाऱ्या मुलीला निदान स्वतःच्या पायावर तरी उभे राहता येईल, अशी अपेक्षा आईवडिलांची असायची. परंतु काळ बदलला आणि सर्वच काही बदलले.

–जयश्री रामेश्वर सावंत,महिला टेलर, घळाटवाडी

## वडीगोद्री येथील उपोषणकर्त्यांना माधव निर्मळांची आर्थिक मदत

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे गेल्या पाच दिवसापासून ओबीसी बचाव या मागणीसाठी लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे उपोषण करत आहे, आंदोलन म्हटले की खर्च आलाच,यासाठी बीडच्या धारूर येथील ओबीसी नेते माधव निर्मळ यांनी रविवारी उपोषणकर्त्यांची भेट घेत आर्थिक मदत केली.

गेल्या पाच दिवसांपासून वडीगोद्री येथे लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे हे उपोषणास बसले आहेत. राज्यभरातून ओबीसी समाज वडीगोद्रीत दाखल होत उपोषणकर्त्यांना आधार देण्याचे काम करत आहे. वडीगोद्री येथे ओबीसी समाजाचा वाढता ओघ





यामुळे भेट देणार्या समाजाला आसन व्यवस्था त्याचप्रमाणे पाण्याची व्यवस्था याची कमतरता भासू नये या साठी बीड जिल्ह्यातील धारूर चे ओबीसी नेते माधव निर्मळ यांनी रविवारी हाके व वाघमारे यांची भेट घेत एक लाख रुपयांची आर्थिक मदत उपोषणकर्त्यांना केली. माधव निर्मळ यांची ओबीसी समाजासाठी सदैव आधारवड म्हणून काम करणारे नेते अशी ओळख आहे. बीड जिल्ह्यातून अडीचशे ओबीसी समाजाच्या कार्यकर्त्यांचा ताफा सोबत घेत वडीगोद्री येथील आंदोलनकर्त्यांची निर्मळ यांनी रविवारी सकाळी भेट घेतली. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या रूपाने ओबीसी समाजासाठी राबणारे व समाजाची धुरा सांभाळणारे नेतृत्व म्हणून पुढे येत असताना माधव निर्मळां सारख्या सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढे येऊन केलेल्या मदतीमुळे ओबीसी समाजातून कृतज्ञता व्यक्त होत आहे.

## मराठी चित्रपटात अंबाजोगाईचे योगदान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या अल्याड पल्याड या मराठी चित्रपटात अंबाजोगाई येथील व्ही आर ऋग्वेद या १९ वर्षीय मुलाने संगीत दिले आहे.

नुकत्या कमी वयातच एका चित्रपटाचा म्युझिक डायरेक्टर म्हणून ऋग्वेद चे नाव पुढे आले आहे. तर या चित्रपटातील दोन गाण्यांचे प्रोडक्शन अंबाजोगाईतील व्ही आर ऋग्वेद म्यूजिक स्टूडियो यातून झाले आहे. अंबाजोगाईकरांसाठी ही खूप आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. या आधी पण अंबाजोगाईतून बऱ्याच दिग्गज व वयस्कर कलाकारांनी आपले नाव बाह्य चित्रसृष्टीत गाजवले आहे परंतु स्वतंत्र एखाद्या इंडस्ट्री मधील चित्रपटाच्या संगीताचे काम मुंबई किंवा पुणे या शहरांमध्ये न करता ते अंबेजोगाई या शहरात झाले आहे व ते खूप उत्तम रित्या पार पाडले गेले आहे.



या चित्रपटात दोन गाणी १.रांगडा नाच २.अल्याड पल्याड (शीर्षक गीत) अशी दोन गाणी ऋग्वेद नी दिग्दर्शित केली आहेत यात रांगडा नीच या गाण्यात अंबाजोगाईची गायिका ऋचा कुलकर्णी हिने गायन केलेले आहे तसेच शार्दूल पाटील यांनी सुद्धा या गाण्यात गायन केले आहे व या गाण्याचे शब्द लिहिले आहेत. उर्वरित कार्य जसे कॉंपोझिंग, मिक्सिंग, म्युझिकल प्रोग्रामिंग, म्युझिक अरेंजमेंट ई. कार्य ऋग्वेद ने केलेले आहे तसेच शीर्षक गीताचे शब्द नायुम पठाण यांनी लिहिले आहेत.

हा चित्रपट प्रीतम एस के पाटील यांनी दिग्दर्शित केलेला आहे तसेच याचे निर्माते शैलेश जैन व महेश निंबाळकर हे आहेत. या चित्रपटात खूप दिग्गज कलाकारांनी काम केलेले आहे जसे मकरंद देशपांडे, गौरव मोर, संदीप पाठक, सक्षम कुलकर्णी, चिन्मय उदगीरकर आदी चित्रपटाला प्रेक्षकांकडून खूप छान प्रतिसाद मिळत आहेत व याची गाणी खूप प्रसिद्ध झाली आहेत. व मराठी चित्रपट सृष्टीत हा एक वेगळा असा थरारपट आहे व यात महत्त्वाचे म्हणजे आपल्या अंबेजोगाई चे योगदान आहे. तुम्ही या चित्रपटाचा आस्वाद आपल्या जवळच्या चित्रपटगृहात जाऊन घेऊ शकता व घ्या. व्ही आर ऋग्वेद यास पुढील प्रवासास खूप खूप शुभेच्छा.



बीड : विधानसभा क्षेत्रातील मंझेरी ह. येथील स्व. युवराज महादेव बहिरवाळ या तरुणाचे विजेचा धक्का लागून काही दिवसापूर्वी निधन झाले होते. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी समीर पठाण,बद्रीनाथ जटाळ, हनुमंत मस्के, गणेश तोडेकर उपस्थित होते.

## श्रीमंत घरची मुले आई वडिलांचा सांभाळ करायला तयार नाहीत, सेवा करीत नाहीत हे वास्तव -ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल

**आष्टी । प्रतिनिधी**

जीवन हे सुंदर आहे परंतु जीवन जगत असताना अध्यात्माचा सुगंध सोबती असावा लागतो.सत्य,सेवा आणि अध्यात्माच्या माध्यमातून मनुष्य आनंदी जीवन जगू शकतो असे सांगत मनुष्याने संसारी जरूर असावे पण त्याहीपेक्षा संस्कारी अधिक असले पाहिजे.गरीबांची झोप श्रीमंत असते तर श्रीमंतांची झोप गरीबी असते असे सांगत त्यांनी आजही श्रीमंत घरची मुले आई वडिलांना सांभाळ करायला तयार नाहीत,सेवा करीत नाहीत हे वास्तव अधोरेखित करून मनुष्याने संसारी जरूर असावे पण त्याहीपेक्षा संस्काराची नितांत गरज असल्याचे सांगत श्रीमंत घरची मुले आई वडिलांना सांभाळ करायला तयार नाहीत,सेवा करीत नाहीत हे वास्तव असल्याचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन अध्यात्म क्षेत्रातील ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल यांनी केले.

आष्टी येथील माऊली नगरात २० व्या.शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचे २४ व्या पुण्यतिथीनिमित्त व संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या सप्तशत्तकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त अ.भा.वारकरी



मंडळाचे प्रेरणाने ज्ञानेश्वरी पारायण,अखंड हरिनाम सप्ताह व संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरु आहे.या सप्ताहात कीर्तन सेवेत ते बोलत होते. यावेळी ह.भ.प.श्रीहरि पुरी महाराज,

ह.भ.प.दिनकरराव तांदळे,गोविंद महाराज पवार,सोनाजी बनकर महाराज, अनिल महाराज गरुड,देविदास बर्डे,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,सरपंच परिवंत गायकवाड,अशोक बळे, ओम महाराज नन्नवरे,तुकाराम महाराज भोसले,रविंद्र तवले,दत्तात्रय निंबाळकर,प्राचार्य के.बी.खाडे,नानासाहेब तवले,कृष्णा बहिरवाल, आबा गांगर्डे,हौसराव आजबे,अवधूत आवारे,ज्ञानेश्वरी केरुळकर,भाऊसाहेब कोकणे उपस्थित होते. पुढे बोलताना ह.भ.प.बबन महाराज म्हणाले की,शांतीब्रम्ह संत एकनाथ हे अतिशय विनम्र होते. अतिशय श्रीमंत होते.त्या एकनाथ महाराज यांच्या घरी परमात्मा पाणी भरीत होते.मृत्यु त्यांच्या हातात होता असे शांतीब्रम्ह पुन्हा होणे नाही.संत महतांनी मानवी जीवनाला फार मोठा भक्तीचा महिमा दिला आहे त्यांनी सांगितलेल्या विचार आणि कार्यावर चालल्यास मनुष्याला यश प्राप्त होते.समाजातील आर्थिक दृष्ट्या श्रीमंत असलेल्या व्यक्तींनी आपल्या घराची दरवाजे सतत उघडी ठेवली पाहिजेत या दरवाजातून गोरगरीब व गरजू समाजातील व्यक्तींना सढळ हाताने मदत करावी अशी वृत्ती ठेवली पाहिजे असे सांगितले.

## इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समितीची राज्यस्तरीय कार्यकारणी जाहीर


### सांस्कृतिक समितीचे राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची माहीती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक अध्यक्षपदी डॉ.राजेश इंगोले यांची नियुक्ती झाल्याबरोबर डॉ.इंगोले यांनी तात्काळ सांस्कृतिक समितीच्या कार्यकारिणीची निवड करीत राज्यकार्यकारणी जाहीर केली आहे.

या कार्यकारणी मध्ये सर्व विभागांना आणि जिल्ह्यातील अनुभवी व कार्यकुशल सदस्यांना प्राधान्य देत डॉ.इंगोले यांनी कार्यकारणी सर्वसमावेशक केल्याचे दिसून येत आहे. कार्यकारिणीच्या उपाध्यक्षपदी पुण्याच्या डॉ.गीतांजली शर्मा तर समन्वयक म्हणून धारूरचे डॉ.तुकाराम मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कार्यकारणी सदस्यांमध्ये ठाण्याचे डॉ.राजन जोशी, डॉ.वैष्णवी पाटील, पश्चिम महाराष्ट्र कुर्डुवाडीचे डॉ.संतोष कुलकर्णी, नाशिकचे डॉ.सारंग दराडे, चिपळूणच्या मिस वर्ल्ड डॉ.कांचन मदार, छत्रपती संभाजीनगरचे डॉ.प्रफुल्ल जटाळ ,परभणीच्या

डॉ.पल्लवी दोडके, अंबाजोगाईचे डॉ.योगेश मुळें, डॉ.विजय लाड व डॉ श.प्रज्ञा किनगावकर, धाराशिवचे डॉ.किरण पोतदार, लातूरच्या डॉ.मोहिनी गानू, डॉ.वृंदा कुलकर्णी, डॉ.मुकुंद भिसे व पिंपरी चिंचवडच्या डॉ.माया भालेराव यांचा समावेश करण्यात आला आहे. विविध कला व सांस्कृतिक क्षेत्रात आपल्या कार्याने स्थान प्राप्त केलेले हे सदस्य निश्चितच इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक समितीत काम करत असताना त्यांच्या पदाला न्याय देऊन पदाची प्रतिष्ठा जपण्याचे काम करतील अशी ग्वाही समितीचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या राज्य व राष्ट्रीय कार्यकारणीला दिली आहे. निवड झालेल्या कार्यकारणी सदस्यांचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.टी.अशोकन, सचिव,महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.दिनेश ठाकरे, राज्यसचिव डॉ.सौरव संजनवाला, डॉ.संतोष कदम, डॉ.राजीव अग्रवाल यांनी अभिनंदन करीत समितीच्या नियुक्तीला अनुमोदन दिले आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे डॉ.जयेश लेले, डॉ.अशोक आढाव, डॉ.रंजन संचेती, डॉ.अशोक तांबे, डॉ.सुहास नेने, डॉ.आरणकर, डॉ.मंगेश पाटे, डॉ.शिवकुमार उत्तुरे, डॉ.रामकृष्ण लोंढे, डॉ.मंगेश गुलवडे, डॉ.वसंत लुंगे, डॉ.जयंत नवरंगे, डॉ.राजेंद्र कुलकर्णी, डॉ.रमेश भराटे, डॉ.उज्ज्वला दहीफळे, डॉ.अनुराग पांगरिकर, डॉ.संजय पाटील यांनी अभिनंदन करीत भावी कारकिर्दीसाठी व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



पान ६ वरून...

#### कत्ती, कोयत्याने प्राणघातक हल्ला

धर्मराज याने माझ्या डोक्यात कोयता मारून रक्त काढून जखमी केले व त्रिंबक विठ्ठल राठोड तुम्हाला जीवे मारून टाकीन अशी धमकी देऊन त्याचे हाथातील कत्तीने माझा भाऊ भीमराव यास जीवे मारण्याचे उद्देशाने त्याच्या डोक्यात मारून डोके फोडून त्याला गंभीर जखमी केले. त्यांच्यासोबत असलेले काशिनाथ राठोड, राजकुमार राठोड यांनी पण मला व माझ्या भावाला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या व म्हणाले की तुला जीवेच मारायचे होते पण सोडून देतो. इथून पुढे आमचे विरुद्ध अर्जबाजारी करायचे नाही असे म्हणून शिवीगाळ केली व तेथून सर्व निघून गेले. सदर फिर्यादीवरून परळी ग्रामीण ठाण्यात गु.र.क्र. १०६/२०२४ कलम ३०७, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भा.द.वी. प्रमाणे गुन्हा नोंद झाला. आरोपींना पोलीस अटक करण्याची भीती असल्याने आरोपींनी अँड. आर.एम.धायगुडे यांचे मार्फत जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालय अंबाजोगाई येथे दाखल केला. प्रकरणात दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून ऍड. आर.एम. धायगुडे यांच्या प्रभावी युक्तीवादानंतर न्यायालयाने आरोपींना अटकपूर्व जामीनवर मुक्त केले .आरोपीतर्फे अँड. आर.एम.धायगुडे यांनी काम पाहिले तर त्यांना अँड.जी.डी. कांदे, अँड.डी.ए. लोंढाळ, अँड.अविनाश धायगुडे यांनी सहकार्य केले.

# कृषी आणि ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी ९०,००० कृषी सखीची टीम तयार करणार!

## शिवराज सिंह चौहान यांची घोषणा



पुणे : ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण आणि कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने आधीच ३४,००० कृषी सख्यांना प्रशिक्षित केले आहे जे त्यांच्या महत्वाकांक्षी लक्ष्याकडे प्रगती करत आहे.

कृषी आणि ग्रामीण विकास मंत्री म्हणून नियुक्ती झाल्यानंतर, शिवराज सिंह चौहान यांनी शनिवारी दोन मंत्रालयांमध्ये समन्वय निर्माण करण्याची त्यांची योजना दर्शविली, जी कदाचित एनडीए सरकारमधील पूर्वीच्या मंत्र्यांनी चुकवली असेल. चौहान यांनी जाहीर केले की ९०,००० कृषी सख्यांची एक टीम तयार करण्याचे काम सुरू आहे जे शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान आणि आधुनिक पद्धती मार्फत मार्गदर्शन करतील.

''आम्ही अनेक बहिणींना प्रशिक्षित केले आहे जेणेकरून त्या शेतकऱ्यांना आणि शेतीला वेगवेगळ्या कामात मदत करू शकतील. अशा सुमारे ३४,००० कृषी सख्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे तर आमचे लक्ष्य ९०,००० जणांची टीम तयार करण्याचे आहे. त्यापैकी बहुतेक सखी बचत गटांमधून आहेत, जे ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे हाताळले जातात, कृषी मंत्रालय सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्यानंतर त्याच्याशी काम करत आहे,'' असे चौहान यांनी माध्यमांना सांगितले. हे प्रशिक्षण सातत्याने दिले जाईल, असे सांगून ते म्हणाले, बचत गटांचे सदस्य प्रत्येक काम अत्यंत प्रामाणिकपणे करतात. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर, या कृषी सखी शेतकऱ्यांना विविध कामांमध्ये मदत करून एका वर्षात सुमारे ६०,०००-८०,००० रुपये अतिरिक्त कमवू शकतील. ''हा कार्यक्रम नुकताच सुरू झाला आहे; आम्ही ते पुढे नेत राहू,'' असेही ते पुढे म्हणाले.

कृषी सखी कार्यक्रम गुजरात, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक, महाराष्ट्र, राजस्थान, ओडिशा, झारखंड, आंध्र प्रदेश आणि मेघालय या १२ राज्यांमध्ये सुरू झाला आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, या कृषी सखींना सर्व पैलूंचे प्रशिक्षण दिले जाते जेणेकरून ते शेतकऱ्यांसाठी सल्लागार म्हणून काम करू शकतील. जर शेतकऱ्यांना त्यांच्या सेवेचा आर्थिक फायदा झाला तर ते या कृषी सख्यांना पैसे देण्यास मागेपुढे पाहणार नाहीत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. याशिवाय, कृषी विस्तार अधिक व्यावहारिक बनवणे हे उद्दिष्ट आहे, जेथे स्थानिक महिला शेतकऱ्यांना सर्वोत्तम शेती पद्धती अवलंबण्यास आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रवृत्त करतात. चौहान पुढे म्हणाले की, सरकारने एक कोटी महिलांना ''लखपती दीदी''बनवण्याचे आपले उद्दिष्ट आधीच गाठले आहे, तर तीन कोटी महिलांना प्रति १ लाखाहून अधिक कमाई करण्याच्या पंतप्रधानांच्या लक्ष्यानुसार आणखी दोन कोटी दीदी (बहिणी) जोडल्या जातील.

## जाणून घ्या गाय गोठा अनुदान योजना

शेतकऱ्यांना शेती तसेच पशुपालनासाठी आर्थिक मदत व्हावी म्हणून गाय गोठा बांधण्यासाठी सरकारकडून गाय गोठा अनुदान योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत १,६०,००० रुपये अनुदान स्वरुपात दिले जाते.

योजनेचे स्वरूप : पशुपालकांकडे असलेल्या जनावरांची संख्या तीन असल्यास, पशुशेड बांधण्यासाठी शासन ७५,००० ते ८०,००० रुपये अनुदान देते. जर एखाद्या शेतकऱ्यांकडे जनावरांची संख्या तीनपेक्षा जास्त असेल, तर या योजनेंतर्गत ज्यामुळे त्यांना जनावरांचे शेड सहज बांधता येणार आहे.

गाय गोठा योजनेसाठी अर्ज कसा करायचा? : गाय गोठा योजनेसाठी सर्वप्रथम आपल्या ग्रामपंचायत ठराव मध्ये नाव समाविष्ट करावे लागेल. यानंतर विहित नमुन्यातील अर्ज नमुना येथे उपलब्ध आहे तो डाउनलोड करून भरावा. यानंतर गोठ्याचा प्रस्ताव पंचायत समिती येथे जमा करावा लागेल. गाय गोठ्याचा प्रस्ताव जमा केल्यानंतर आपल्या अर्जास मंजूरी दिली जाईल. यानंतर आपल्याला ज्या ठिकाणी गोठा बांधायचा आहे त्या जागेचे जिओ टॅगिंग केले जाईल. जिओ टॅगिंग झाल्यानंतर आपल्याला वर्क ऑर्डर दिली जाईल.



## तुरीचे सुधारित वाण आणि वैशिष्टे

तूर हे खरीप हंगामातील अत्यंत महत्वाचे पीक. राज्यात सर्वसाधारपणे १२ ते १३ लाख हेक्टर क्षेत्रावर अति लवकर, मध्यम लवकर आणि मध्यम ते उशिरा कालावधीच्या वाणांची निर्मिती राज्यातील कृषि विद्यापीठांनी केली आहे. तुरीच्या अधिक उत्पादनासाठी पाऊसमान आणि जमिनीचा प्रकार लक्षात घेऊन योग्य वाणांची पेरणी करणे फायदेशीर ठरते. तुरीच्या वाणाची निवड करताना जमिनीच्या प्रकारानुसार करणे गरजेचे असते. कारण भारी जमिनीत अधिक उत्पादन देणारे तुरीचे वाण हे मध्यम ते हलक्या जमिनीत तितकेच उत्पादन देतील असे नाही. मध्यम प्रकारच्या जमिनीकरिता कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणांची निवड करावी. लट भारी जमीन असेल तर मध्यम ते उशिरा कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणाची निवड करावी.

बी डी एन ७११ : मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात कोरडवाहू लागवडीसाठी, हलक्या व मध्यम जमिनीत पेरता येणारा १५० ते १५५ दिवसात तयार होणारा ,एकाच वेळी पक्व होणारा,यांत्रिक पद्धतीने काढता येणारा शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेला वाण.

बी डी एन ७११, गोदावरी, बी एस एम आर ८५३ : लाल/तांबड्या /तपकिरी/ फिकट तपकिरी दाण्याचे वाण :फुले राजेश्वरी, फुले तृप्ती, फुले पल्लवी, बी डी एन ७०८, बी डी एन ७१६, रेणुका, बी एस एम आर ७३६, आय सी पी एल ८७, आय सी पी एल ८७११९, पी.के.व्ही तारा, पी.डी. के.व्ही .आश्लेषा,ए के.टी ८८११ .



फुले पल्लवी (फुले तूर १२-१९-२) - वैशिष्टे : मध्यम पक्वता कालावधी ,दाणे टपोरे फिकट तपकिरी ,मर व वांझ या रोगास मध्यम प्रतिकारक्षम शेंगा पोखरणारी अळी,शेग माशी या किडींना कमी बळी, हेक्टरी उत्पादन:२१.४५ क्विं/हे.

फुले तृप्ती - वैशिष्टे : दाणे आकाराने टपोरे ,दाण्याचा रंग फिक्कट तपकिरी मार व वांझ रोगास मध्यम प्रतिकारक्षम शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडीचा प्रादुर्भाव कमी. हेक्टरी उत्पादन:२२-२३ क्विं/हे. फुले राजेश्वरी - वैशिष्टे : तांबड्या रंगाचे टपोरे दाणे , मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन: २८-३० क्विं/हे. पी.के .व्ही.तारा - वैशिष्टे : दाण्याचा रंग लाल ,मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन:१९-२० क्विं/हे. पी.डी. के.व्ही.आश्लेषा - वैशिष्टे : दाणे टपोरे आणि लाल रंगाचे,मर,वांझ, करपा आणि पानावरील ठिपके या रोगांना मध्यम प्रतिकारक्षम, जिरायत लागवडीसाठी योग्य. हेक्टरी उत्पादन :१९-२० क्विं/हे. ए के टी ८८११ - वैशिष्टे : दाण्याचा रंग लाल,मध्यम टपोरे दाणे, मर रोगास मध्यम प्रतिकारक्षम हेक्टरी उत्पादन: १०-११ क्विं/हे.

बी डी एन पी एच-१८-५ - वैशिष्टे :राज्यातील पहिला संकरित वाण,दाण्याचा रंग पांढरा,मर व वांझ रोगास मध्यम प्रतिकारक्षम. हेक्टरी उत्पादन:१८ - २२ क्विंटल /हेक्टर.

बी डी. एन ७०८ (अमोल) - वैशिष्टे : शेंगा गर्द लाल, दाणे चमकदार लाल रंगाचे, मध्यम आकाराचे, शेंगा पोखरणाऱ्या किडीस सहनक्षम. हेक्टरी उत्पादन:१६-१८ क्विंटल /हेक्टर.

बी.डी. एन ७११ - वैशिष्टे : दाणा पांढरा, हलक्या व मध्यम जमिनीस योग्य,शेंगा एकाच वेळी पक्व, यांत्रिक पद्धतीने काढता येतात,लवकर पक्व होत असल्याने रब्बीत दुबार पीक घेणे शक्य. हेक्टरी उत्पादन:१६-२३ क्विंटल /हेक्टर. याशिवय बी.डी. एन ७१६, गोदावरी (बी.डी.एन. २०१३ ४१), रेणुका, बी.एस एम आर. ७३६, बी.एस एम आर ८५३, इक्रीसॅट,हैद्राबाद विकसित वाण, आय सी पी एल ८७ ( प्रगती), आय सी पी एल ८७११९ (आशा), ही वाणही प्रसिद्ध आहेत. वरील नमूद तुरीच्या वाणाच्या बियाण्याच्या उपलब्धते संबंधित कृषी विद्यापीठ, शेतकऱ्यांच्या बीजोत्पादन कंपनी, महाबीज किंवा शासनाच्या इतर मान्यताप्राप्त कंपन्या यांच्याशी आपण संपर्क करू शकता. या संदर्भामध्ये अधिक माहिती संबंधितांकडून प्राप्त होऊ शकते. जमिनीचा प्रकार, संरक्षित ओलिताची सोय , वाणाचा परिपक्वता कालावधी व मर व वांझ रोगाचा होणारा प्रादुर्भाव या सर्व बाबी लक्षात घेऊन तुरीच्या वाणाची निवड करावी.

# कारली व दोडका लागवड तंत्रज्ञान

कारली व दोडका या सारख्या वेलभाज्यांना मांडव बांबू इत्यादी प्रकारांचा आधार द्यावा लागतो. कारली व दोडका यांच्या वाढीची सवय व मशागतीची सुत्रे जवळ जवळ सारखीच आहेत. महाराष्ट्रामध्ये कारल्याचे अंदाजे ४५३ हेक्टर क्षेत्र असून दोडका या पिकाखाली ११४७ हेक्टर क्षेत्र आहे. काल्र्याला परदेशात व मोठया शहरात तर दोडक्याला स्थानिक बाजारपेठेत नेहमीच मागणी असते.

हवामान : या दोन्ही पिकांची पावसाळी व उन्हाळी हंगामात लागवड करतात. कारल्यास उष्ण व दमट हवामान तर दोडक्यास समशितोष्ण व दमट हवामान मानवते. दोडका थोडीशी थंडी सहन करु शकतो. मात्र कारल्याच्या वेलीवर थंडीचा परिणाम होतो.

जमीन : भुसभूशीत चांगला निचरा असणारी भारी ते मध्यम जमनीत लागवड करावी. चोपण अथवा चिबड जमिनीत ही पिके घेऊ नयेत.

पूर्वमशागत व लागवड : जमीनीची उभी आडवी नांगरट करून तणांचे व गवतांचे तुकडे वेचून शेत स्वच्छ करावे. तदूनंतर प्रति हेक्टरी १०० ते १५० क्विंटल शेणखत किंवा कंपोस्टखत टाकावे. कुळवणी करून खत जमिनीत चांगले मिसळावे. कारल्याच्या लागवडीसाठी दोन ओळीत १.५ ते २ मिटर व दोन वेलीत ६० सेमी अंतर ठेवावे. दोडक्यासाठी दोन ओळी २.५ ते ३.५ मिटर वर दोन वेलीत ८० ते १२० सेमी अंतर ठेवतात. प्रत्येक ठिकाणी २ ते ३ बिया लावतात. दोन्ही पिकात बियांची टोकन ओलसर जमिनीत करावीत. बिया वरंब्याच्या बगलेत टोकाव्यात. उगवण होईपर्यंत पाणी बेताचे द्यावे.

हंगाम : खरीपाची लागवड जून - जूलै महिन्यात करतात. दोडका कमी दिवसात येणार असल्यामुळे त्याची लागवड कारल्यापेक्षा १५ ते २० दिवसांनी उशिरा केली तरी चालते.



वाण : कारले - कोईमतूर लॉग : या जातीची कारली पांढरी व लांब असतात. या जातीची लागवड महाराष्ट्रात पावसाळी हंगामात होते. अरका हरित : या जातीची कारली आकर्षक लहान मध्यम भगी फूगीर, हिरवीगार असतात. फळांमध्ये बियांचे प्रमाण अल्प असते. पुसा दो मोसमी : या जातीचे फळ वजनदार व लांब व हिरवे असते. ही जात दोन्ही हंगामात योग्य आहे. ५५ दिवसांत फळे काढणीस सुरुवात होते.

पुसा विशेष : ही जात उन्हाळी हंगामासाठी योग्य असून नदी काठच्या लागवडीस योग्य आहे. या शिवाय विद्यापीठाने विकसित केलेल्या सिलेक्शन-४, सिलेक्शन-५, सिलेक्शन-६ तसेच कोकण तारा, फुले ग्रिन गोल्ड अर्काहरित, हिरकणी या जाती लागवडीस योग्य आहे.

दोडका - पुसा नसदार : या जातीची फळे एकसारखी लांब व हिरवट रंगाची असतात. या जातीस ६० दिवसांनी फूले येतात. प्रत्येक वेलीस १५ ते २० फळे लागतात.

को-१ : ही हळवी जात असून दोडके ६० ते ७५ सेमी लांबीची असतात. प्रत्येक वेलीस ४ ते ५ किलो फळे लागतात. या शिवाय पुसा चिकणी कोण हरिता, फुले सूचेता तसेच स्थानिक जाती लागवडीयोग्य आहेत.

बियाण्यांचे प्रमाण : कारल्यासाठी हेक्टरी ५ ते ६ किलो बियाणे लागते. बियाणे २५ ते ५० पी.पी.एम.जी.ए. किंवा ४० पी.पी.एम.एन.ए.ए. च्या द्रावणात बुडवून नंतर प्रतिकिलो बियाण्यास ३ ते ४ ग्रॅम कार्बोन्डॅझिम लावून नंतर लागवड करावी. दोडक्यासाठी हेक्टरी ३ ते ४ किलो ग्रॅम बियाणे लागते.

खते व पाणी व्यवस्थापन : कारले पिकासाठी प्रति हेक्टरी २० किलो नत्र ३० किलो स्फूरद व ३० किलो पालाश लागणीच्या वेळी द्यावे व नत्राचा दुसरा हप्ता २० किलो या प्रमाणाम फूले दिसायच्या वेळेस द्यावा. तसेच दोडका पिकासाठी प्रति हेक्टरी २० ते ३० किलो नत्र २५ किलो स्फूरद व २५ किलो पालाश लागवडीच्या वेळी द्यावेत. व नत्राचा २५ ते ३० किलोचा दुसरा हप्ता १ महिन्याने द्यावा.

आंतरशागत : झाडा भोवतालचे तण काढून स्वच्छता ठेवावी, जमिन नेहमी भुसभुशीत ठेवावी. दोन्ही पिकास आधाराची गरज असल्यामुळे बांबू अगर झाडांच्या वाळलेल्या फांद्यांचा वापर करावा. तसेच तारांवर सुध्दा वेली पसरवून त्यापासून चांगला नफा मिळविता येतो.

रोग व कीड : रोग : या पिकांवर प्रामुख्याने केवडा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होतो. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी डिनोकॅप -१ मिली. १ लिटर पाण्यातून फवारावे तसेच केवडा या रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन झेड ७८ हेक्टरी औषध १० ग्रॅम १० लिटर पाण्यातून फवारावे.

किडी : या पिकांवर प्रामुख्याने तांबडे भुंगिरे, फळमाशी व मावा या किडीचा प्रादुर्भाव होतो. पाने खाणारी आळीच्या नियंत्रणासाठी ट्रायॲझोफॉस २ मिली प्रतिलिटर पाण्यातून फवारावे. फळ माशीच्या नियंत्रणासाठी मेलॉथिऑन २ मिली प्रतिलिटर पाण्यातून फवारावे.

काढणी व उत्पादन : लागवडीनंतर ६० ते ६५ दिवसांनी फुलावर येतो. पुर्ण वाढलेली पण कोवळी फळे काढावीत. नखाने हळूच दाबल्यावर व्रण पडतो. ती फळे कोवळी समजावीत. दोडक्याचे हेक्टरी १०० ते १५० क्विंटल उत्पादन मिळते. कारल्याची फळे कोवळी असतानाच काढावीत. कारल्याचे हेक्टरी १०० ते १५० क्विंटल उत्पादन येते.




### महत्वाच्या घटना

१५७६ : मुघल शासक अकबर आणि महाराणा प्रताप यांच्यात हळदी घाटीच्या युद्धाला सुरुवात झाली.
१७७६ : महाराणा प्रताप व अकबर यांच्यात 'हळदी घाटा' ची सुप्रसिध्द घनघोर लढाई झाली.
१८१५ : वॉटर्लूच्या लढाईत नेपोलियनचा दारुण पराभव
१८३० : फ्रान्सने अल्जीरिया ताब्यात घेतले.
१९०८ : फिलीपाइन्स विश्वविद्यालाची स्थापना झाली.
१९३० : चीनचा सम्राट डोवागर लोंग्यू याने देशातील सर्व परदेशी व्यक्तींना ठार करण्याचा हुकूम दिला.
१९४६ : डॉ. राममनोहर लोहिया यांनी गोव्याच्या मडगाव शहरातून गोवा मुक्तीचे रणशिंग फुंकले. या घटनेच्या स्मरणार्थ पणजींतील एका रस्त्याला '१८ जून रस्ता' असे नाव देण्यात आले आहे.
१९५६ : रँग्लर र. पु. परांजपे पुणे विद्यापीठाचे दुसरे कुलगुरू झाले.
१९८१ : जनावरांमधे आढळणार्या लाळ्या-खुरकुत रोगावरील पहिली जनुकीय लस विकसित झाली.
१९८३ : अंतराळवीर सैली राइड या अंतराळात प्रवास करणाऱ्या पहिल्या अमेरिकन महिला आहेत.
१९८७ : एम. एस. स्वामिनाथन यांना प्रथम जागतिक अन्न पुरस्कार (वल्ड फूड) मिळाला.
२००६ : कॅझसॅट या कझाकस्तानच्या पहिल्या उपग्रहाचे प्रक्षेपण.
२००९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने चंद्रावर पाण्याचा शोध घेण्यासाठी विशेष उपग्रह पाठविला.
२०१३ : भारताच्या उत्तराखंड राज्यात मुसळधार पाउस पडून मंदाकिनी व अलकनंदा नद्यांना महापूर. शेकडो मृत्युमुखी, हजारो बेघर.
२०१७ : किदम्बी श्रीकांतला इंडोनेशिया सुपर सीरिजचे जेतेपद भारतीय बॅडमिंटनपटू किदम्बी श्रीकांतने इंडोनेशिया सुपर सीरिज प्रिमिअरच्या पुरुष एकेरीत जेतेपद पटकावले. असे करणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.
२०१७ : भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्रीने समकालीन खेळाडूंमध्ये सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : राजपूत नेपाळ शासक तसचं, नेपाळचे पहिले पंतप्रधान व राणा राजवंशाचे संस्थापक जङ्गबहादुर राणा यांचा जन्मदिन.
१८८७ : थोर भारतीय स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी, शिक्षक, राजनीतिज्ञ, तसचं, बिहार राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री डॉ.अनुग्रह नारायण सिन्हा यांचा जन्मदिन.
१८९९ : शंकर त्रिंबक तथा 'दादा' धर्माधिकारी स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक (मृत्यू: १ डिसेंबर १९८५)
१९११ : कमला सोहोनी पहिल्या भारतीय महिला शास्त्रज्ञ (मृत्यू: ८ सप्टेंबर १९९७)
१९३१ : के. एस. सुदर्शन प्रखर राष्ट्रवादी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ५ वे सरसंघचालक (मृत्यू: १५ सप्टेंबर २०१२)
१९३१ : ब्राझील देशाचे समाजशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि राजकारणी तसचं, ब्राझील देशाचे माजी राष्ट्रपती फर्नांडो हेन्रिक कार्डोसो यांचा जन्मदिन.
१९३४ : भारतीय वंशीय संगणक वैज्ञानिक, बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थान, संगणक विज्ञान विभागाचे माजी प्राध्यापक ई.वी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन.
१९४२ : पॉल मॅकार्टनी संगीतकार, संगीतसंयोजक, वादक, गीतलेखक, 'बीटल्स'चा सदस्य
१९४२ : थाबो म्बेकी दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष
१९६५ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (मृत्यू: २२ जुलै २००३)
१९८६ : फ्रेंच व्यावसायिक टेनिसपटू रिचर्ड गॅब्रिएल सायर गैस्के यांचा जन्मदिन.
१९८७ : इंग्लंड देशाचे महान क्रिकेटपटू मोईन अली यांचा जन्मदिन.
१९९४ : युवा भारतीयह टेनिसपटू प्रार्थना गुलाबराव ठोंबरे यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५८ : मणिकर्णिका तांबे ऊर्फ 'राणी लक्ष्मीबाई' झाशीची राणी इंग्रजांचा पाठलाग टाळण्याच्या प्रयत्नात झालेल्या चकमकीत मृत्यूमुखी पडल्या (जन्म: १९ नोव्हेंबर १८२८)
१९०१ : रामचंद्र भिकाजी गुंजीकर 'मोचनगड' या मराठीतील पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे लेखक आणि 'विविध ज्ञानविस्तार' मासिकाचे संपादक (जन्म: १० एप्रिल १८४३)
१९०२ : सॅम्युअल बटलर इंग्लिश लेखक (जन्म: ४ डिसेंबर १८३५)
१९३६ : मॅक्झिम गॉर्की रशियन लेखक (जन्म: २८ मार्च १८६८)
१९५८ : डग्लस जार्डिन इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ आक्टोबर १९००)
१९६२ : जे. आर. तथा नानासाहेब घारपुरे पुण्याच्या विधी महाविद्यालयाचे संस्थापक आणि प्राचार्य, नामवंत विद्वान (जन्म:)
१९७४ : सेठ गोविंद दास स्वातंत्र्यसैनिक, लोकसभेचे हंगामी सभापती, साहित्यिक (जन्म: १६ आक्टोबर १८९६)
१९९९ : श्रीपाद रामकृष्ण काळे ५२ कादंबर्या आणि ११०० हुन अधिक कथा लिहिणारे साहित्यिक, कथा आणि कादंबरीकार (जन्म: )
२००३ : जानकीदास हिन्दी चित्रपटातील चरित्र अभिनेते (जन्म: १९१०)
२००५ : भारतीय क्रिकेटपटू मुश्ताक अली यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९१४)
२००९ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९६९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (जन्म: १४ एप्रिल१९२२ शिबपूर, कोमिल्ला, बांगला देश)
२०२० : लच्छमानसिंग लेहल मेजर-जनरल वीर चक्र, परम विशिष्ठ सेवा (जन्म: ९ जुलै १९२३)
२०२१ : मिल्खा सिंग द फ्लाइंग शीख, धावपटू पद्मश्री (जन्म: ८ ऑक्टोबर १९३५)

# शालेय पोषण आहारात अनियमितता प्रकरणी वडझरी आश्रम शाळेचा मुख्याध्यापक निलंबित

## कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन याचे आदेश

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वडझरी येथील मातोश्री सेवाभावी संस्था संचलित संत शिरोमणी भगवान बाबा प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण लिंबाजी वनवे यांना शालेय पोषण आहारातील अनियमितता प्रकरणात निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करण्यात यावी तसेच प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (पूर्वीची शालेय पोषण आहार) योजनेच्या अनुषंगाने झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई तत्कालीन पुरवठादारांसोबत करण्यात आलेल्या करारनाम्यातील धान्यादी मालाच्या दरानुसार संबंधित मुख्याध्यापक प्रवीण लिंबाजी वनवे यांच्याकडून वसूल करण्यात यावी. असे आदेश अजित जगताप,कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहूजन कल्याण विभाग छत्रपती संभाजी नगर व सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड यांना दिले आहेत. यासंबंधीची तक्रार शाळेतील कर्मचारी धनंजय सानप यांच्यासह ईतर कर्मचाऱ्यांनी केली होती.संबधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी ''भिक मांगो''आंदोलन करण्यात आले होते.अखेर त्यांना निलंबित करण्यात येऊन अपहार प्रकरणातील रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले आहेत.



पाटोदा तालुक्यातील वडझरी येथील मातोश्री सेवाभावी संस्था संचलित संत शिरोमणी भगवान बाबा प्राथमिक आश्रम शाळेतील शालेय पोषण आहाराबाबत शैक्षणिक वर्ष सन २०२८ -१९, २०१९-२०२०,२०२०-२०२१ या कालावधीत फार मोठ्या प्रमाणात अनियमितता व अपहार झाल्याची तक्रार सदरील शाळेतील कर्मचारी यांनी शिक्षण विभाग बीड यांच्याकडे केली होती. त्या अनुषंगाने शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या स्तरावरून चौकशी करून अहवाल सादर केल्यानंतर संबंधित मुख्याध्यापक प्रवीण लिंबाजी वनवे यांना निलंबित करण्याचे आदेश दि.०५ जुन २०२४ रोजी कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन अजित जगताप यांनी दिलेले आहेत. वडझरी येथील संत शिरोमणी भगवान बाबा प्राथमिक आश्रम शाळा यांनी बोगस पटसंख्या दाखवून वर्गवाढ करणे तसेच भुतलावर अस्तित्वात नसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या दाखवून शालेय पोषण आहार गैरव्यवहार तसेच शिक्षक परीक्षा पात्र नसताना शिक्षक भरती करून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये शासनाची फसवणूक करून कर्मचारी भरती करणे आदि गैरव्यवहार प्रकरणात कारवाई करण्यात यावी यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सहशिक्षक धनंजय सानप व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी ''भिक मांगो''आंदोलन करण्यात आले होते. अखेर संबंधित प्रकरणात जबाबदार मुख्याध्यापक प्रवीण लिंबाजी वनवे यांना अजित जगताप कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी निलंबित करून त्यांच्या विरोधात शिस्तभंगाची कार्यवाही सुरू करण्यात येऊन प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण ( पुर्वीची शालेय पोषण आहार) योजनेच्या अनुषंगाने झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई वसूल करण्याचे आदेश दिले आहेत.

# बीड जिल्ह्यात होणार १९ जून पासून पोलीस भरती

## १७० पदासाठी आले ८४२९ अर्ज

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये येत्या १९ जून पासून पोलीस मुख्यालयावर पोलीस भरती प्रक्रिया सुरू होणार असून पोलीस शिपाई चालक पोलीस शिपाई आणि बँड्समन पोलीस शिपाई या तीन पदासाठी मिळून १७० जागा असून यासाठी ८४२९ अर्ज आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दिली यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेला अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक डॉ.संतोष साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर म्हणाले की संपूर्ण महाराष्ट्रा मध्ये ही भरती प्रक्रिया होणार असून बीड जिल्ह्यात पोलीस शिपाई, पोलीस शिपाई चालक व पोलीस शिपाई बँड्समन अशा तीन कॅटेगरीसाठी १७० पदे असून यासाठी ८४२९ अर्ज आलेले आहेत .यातील पोलीस शिपाई या कॅटेगरीच्या १६४ पदासाठी ७५४५ अर्ज ,पोलीस शिपाई चालक पदासाठी ५ जागांसाठी ६९३ अर्ज तर पोलीस बँड्समनच्या एका जागेसाठी १९१ अर्ज आल्याची माहिती पोलीस अधीक्षकांनी दिली. पुढे बोलताना पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर म्हणाले की या उमेदवारांची शारीरिक चाचणी होणार असून पुरुषांसाठी १०० मीटर, १६०० मीटर धावणे व गोळा फेक अशी स्पर्धा राहील तर महिलांसाठी शंभर मीटर धावणे ,८०० मीटर धावणे व गोळा फेक अशी स्पर्धा राहील. वाहन चालकासाठी १६०० मीटर धावणे व गोळा फेक तर महिला उमेदवारांसाठी ८०० मीटर धावणे व गोळाफेक अशी स्पर्धा राहील. बँड्समन साठी १०० मीटर , १६०० मीटर धावणे व गोळा फेक याबरोबरच बँड टेस्ट तर वाहन चालकांसाठी वाहन चालवण्याची टेस्ट राहणार आहे .त्यानंतर लेखी परीक्षा होणार आहे. सध्या पावसाळा असल्याने याचे नियोजन केले असून टेस्ट मागेपुढे होऊ शकते प्रत्येक उमेदवाराला एकाच ठिकाणी अर्ज करता येईल. मात्र बाहेरच्या जिल्ह्यात एस. आर. पी. एफ. साठी कोणी अर्ज केला तर त्याला वेगळी तारीख देण्याची सुविधा आहे. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची तपासणी करावी लागेल .ही भरती दिनांक १९ ते २८ जून दरम्यान होणार असून याच ठिकाणी उमेदवाराला आपले गुण सांगितले जातील .संपूर्ण भरती पारदर्शक पद्धतीने उमेदवारांनी कुठल्याही आमिषाला बळी पडू नये असे आवाहन पोलीस अधीक्षकांनी केले आहे. या पदासाठी महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाही तर पुरुष उमेदवारातून निवड केली जाईल. प्रत्येक दिवशी या ठिकाणी वेगवेगळे अधिकारी राहतील तसेच तक्रारी ऐकून घेण्यासाठी ग्रह खात्याचे पोलीस उपाधीक्षक या ठिकाणी हजर असतील .अशी माहिती पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दिली.

# संघर्षयोद्धा मनोज जरांगे चित्रपटाला गेवराईत उत्स्फूर्त प्रतिसाद

## स्थानिक कलावंत सहभागाने अधिक उत्साह



गेवराई । प्रतिनिधी

बहुचर्चित व्यक्तिमत्व मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनावर आधारित असलेला संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हा चित्रपट महाराष्ट्रभर १४ जून रोजी प्रदर्शित झाला आहे. सोनई फिल्म क्रिएशनच्या या चित्रपटाचे निर्माते गोवर्धन दोलतडे,असून दिग्दर्शक शिवाजी दोलतडे आहेत.

यातील मनोज जरांगे पाटील यांची भूमिका रोहन पाटील यांनी साकारलीअसून या चित्रपटाच्या पटकथा व संवाद लेखनाची जबाबदारी गेवराईचे भूमिपुत्र असलेले डॉ . सुधीर निकम यांनी निभावली आहे. गेल्या दोन वर्षापासून मराठा आरक्षण या विषयावर आपला विचार प्रभावीपणे महाराष्ट्रभर मांडून एक वादळ उभे करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची चित्रपटांमध्ये बायोपिक पद्धतीने मांडणी करणे, हे शिवधनुष्य सोनाई फिल्म क्रिएशनने यशस्वीपणे उचलले आहे.

हे करताना त्यांनी ज्या अंतरवाली सराटी गावामध्ये या सर्व हालचाली होत आहेत त्याच भागातील लाईव्ह लोकेशन चा वापर करून त्या चित्रपटांमध्ये अधिक जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. यालाच जोड म्हणून गेवराई-आंतरवाली सराटी व - मनोज जरांगे पाटील यांचे एक नाते तयार झालेले असल्यामुळे याच भागातील कलावंतांच्या सहभागानेदेखील हा चित्रपट चर्चेचा विषय बनला आहे. गेवराई येथील प्रसिद्ध नाटककार ॲड . सुभाष निकम,पटकथा व संवादलेखक डॉ . सुधीर निकम, चित्रपट अभिनेते प्रशांत रुईकर,बीडच्या अनुराधा प्रकाश,यांच्या अनुभवी अभिनयाची जाणीव असणाऱ्या कलावंतांचे मध्यवर्ती सीन असल्यामुळे,या भूमिका प्रेक्षकांची दाद मिळवून जात आहेत आहेत.

या सर्व भूमिका गेवराईकरांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले असून मनोज जरांगे पाटील यांच्यावरील प्रेम व यात स्थानिक कलावंतांचा सहभाग असा दुग्धशर्करा योग यामध्ये दिसून येतो आहे. या सोबतच दीपक गिरी, शिवकुमार सोनवणे,संतोष कसबे, डॉ . मुरलीधर मोटे, डॉ .रचना मोटे, चंद्रकांत सरोदे आदींचा देखील यामध्ये सहभाग आहे. गेवराई व परिसरातील जास्तीत जास्त प्रेक्षकांनी या चित्रपटाचा आस्वाद घ्यावा ,असे आवाहन सोनई फिल्म क्रिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# देवठाणा-जैतापूर ग्रामपंचायत चे पाणीपुरवठ्याचे काम पूर्णत्वास

## सरपंच भागवत दराडे यांच्या प्रयत्नामुळे तीन तांडे,दोन गावास जाणवला नाही दुष्काळ

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील देवठाणा-जैतापूर या ग्रुप ग्रामपंचायत चे पाणीपुरवठयाचे काम सरपंच भागवत दराडे यांच्या प्रयत्नामुळे पूर्णत्वास गेले असून, येथील तीन तांडे व दोन गावात उन्हाळाभर पाण्याचा कसलाही दुष्काळ जाणवला नाही.धारूर तालुक्यात पाणीपुरवठ्याचे शंभर टक्के पूर्ण काम करणारी ग्रामपंचायत म्हणून देवठाणा-जैतापूर ग्रामपंचायत ची ओळख निर्माण झाली आहे. ग्रामपंचायत ने पाणीपुरवठ्याचे काम पूर्ण केल्यामुळे आमदार प्रकाश सोळंके यांनी कौतुक करत गावच्या विकासाचा आढावा घेतला. देवठाणा व तीन तांड्याला एक कोटी रुपये तर जैतापूर येथे ५० लाख रुपये एवढा निधी पाणीपुरवठ्यास मंजूर झाला होता. येथील सरपंच भागवत दराडे यांनी कर्तव्यदक्षपणे देवठाणा,जैतापूर पाणीपुरवठ्याचे काम शंभर टक्के पूर्ण करत विहीर, टाकी व पाईपलाईन गावापर्यंत पोहोच केली आहे. भीषण दुष्काळात सुद्धा पाणी उपलब्ध करून ग्रामस्थांना दुष्काळ जाणवू दिला नाही. येथे भीषण दुष्काळ असल्यामुळे सुकळी येथून विहीर पाईपलाईन चे काम झालेले असताना तळ्यातील पाणी आटल्याने दोन महिन्यात पाण्याची चन-चन भासली मात्र यंदाच्या पावसाळ्यात सुरूवातीला पाऊस चांगल्या प्रमाणात झाल्यामुळे पाणीपुरवठा विहीरीत पाणी उपलब्ध झाले आहे. त्यामुळे भविष्यात या दोन्ही गावासह तिन्ही तांड्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटला आहे.



आमच्या दोन्ही गावात आणि तिन्ही तांड्यावर पाणीपुरवठ्याचे शंभर टक्के काम पूर्ण झाले आहे. आमदार प्रकाशदादा सोळंके व माजी जिल्हा परिषद सभापती जयसिंग सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली गावात घरोघरी पाणी उपलब्ध करण्यात आले असून पाण्याचा प्रश्न मार्गी लावल्याचे मला समाधान वाटते

– भागवत दराडे, सरपंच जैतापूर/देवठाणा ग्रुप ग्रामपंचायत.

# मानवाच्या उद्धारासाठी संत- गुरुकृपा, मार्गदर्शनाची आवश्यकता - पुजारी

बीड । प्रतिनिधी

संस्थान श्री विठ्ठल मंदिर येथे चालू असलेल्या प्रति वार्षिक उत्सवानिमित्ताने कीर्तन सेवेसाठी घेतलेला संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा सुंदर असा अभंग असून भगवंताच्या विशेष उत्सवानिमित्त जेथे नित्य उत्सव चालू असतात त्यालाच मंदिर म्हणावे असे सांगितले असून अनेक वेळा मंदिर उभे केले जाते पण ते टिकविण्यासाठी अनेक कष्ट घ्यावे लागतात अशा ठिकाणी भगवंताचा कृपेने त्या भागातील भाविक नित्यसेवेचा आनंद घेतात तेथे नक्कीच भगवंताची कृपादृष्टी होत असते. पेठेतील संस्थान श्री विठ्ठल मंदिर संस्थांनच्या या उत्सव परंपरेला जवळपास दोनशेहून अधिक वर्षाची परंपरा असून कोणताही मनुष्य स्वतःचा उद्धार स्वतः करू शकत नाही त्यासाठी गुरु, संतांच्या आशीर्वादाची, मार्गदर्शनाची गरज असते गुरु उपदेश आवश्यक असतो. खरे पाहिले तर आपणच करा आपला उद्धार हे जरी खरे असले तरीही सद्गुरूंच्या उपदेशाची प्रत्येक मानवाला आवश्यकता असल्याचे प्रतिपादन ह.भ.प.श्नी. चिन्मय महाराज पुजारी यांनी संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या सेवितो हा रस वाटितो आणिका ।घ्या रे होऊ नका राणभरी ।।१।।विटेवरी ज्याची पाउले समान ।तोचि एक दानशूर दाता ।।धृपद।।मनाचे संकल्प पाववील सिद्धी ।जरी राहे बुद्धी याचे पायी ।।२।।तुका म्हणे मज धाडिले निरोपा ।मारग हा सोपा सुखरूप ।।३।। या किर्तन सेवेसाठी घेतलेली अभंगावर रविवारी कीर्तन सेवा श्रीचरणी अर्पण केली.

# सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे अपघाताचे प्रमाण अधिक?

धारूर। प्रतिनिधी

खामगाव पंढरपूर महामार्गावर अरणवाडी ते धारूर असा नागमोडी वळणाचा मोठा घाट आहे या घाटात दररोज अपघात घडत आहेत घाट रुंदीकरणाचा प्रश्न प्रलंबित असला तरी घाटातील वाहतुकीच्या सुरक्षेसाठी उपाययोजना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कराव्यात अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे

धारूरचा घाट अत्यंत कठीण व नागमोडी वळणांचा आहे या घाटामध्ये सतत अपघाताच्या मालिका घडत असताना सार्वजनिक बांधकाम विभाग सुरक्षित वाहतुकीसाठी रस्त्याच्या कडेला उभा केलेल्या लोखंडी जाळ्या तसेच बांधलेल्या कठडे अपघातामुळे मोडून पडले आहेत या कठड्या कडे सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष केल्यामुळे अपघाताचे प्रमाण अधिकच वाढत आहे



घाटातील पडलेल्या सुरक्षा कठडे पडले आहेत तसेच घाटातून प्रवास करणार प्रवाशांना सुरक्षित प्रवासासाठी काही सूचना फलक लावणे आवश्यक असताना सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे डोळेझाक केलेले दिसते त्यामुळे घाटातील अपघाताचे प्रमाण कमी होताना दिसत नाही घाटातील सुरक्षित कठडे बांधकाम करावे व सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता सार्वजनिक बांधकाम विभागाने करावे असे मागणी तालुक्यातील नागरिकांची आहे.

# खंडेराव जगदाळे यांच्या पाठीशी कायम राहणार - सतेज पाटील

बीड । प्रतिनिधी

राज्यातील कायम विनाअनुदानित शाळेच्या अनुदानासाठी कायम संघर्ष करणारे महाराष्ट्र राज्य (कायम) विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष 'संघर्ष योध्दा' श्री. खंडेराव जगदाळे यांच्या पाठीशी भविष्यात सदैव राहू अशी ग्वाही माजी गृह राज्यमंत्री सतेज पाटील उर्फ बंटी पाटील यांनी विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने राज्य उपाध्यक्ष 'संघर्ष योध्दा' खंडेराव जगदाळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सपत्निक सत्कार सोहळा व शैक्षणिक दिनदर्शिका प्रकाशन सोहळ्या प्रसंगी बोलताना दिली.

गेल्या २५ वर्षांपासून विनाअनुदानित शाळा व शिक्षक यांच्या विविध मागण्यांसाठी अहोरात्र झटणारे 'संघर्ष योध्दा' खंडेराव जगदाळे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे रविवार दिनांक १६ जून रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवरांनी विनाअनुदानित शाळांना अनुदानावर येण्यासाठी संघर्ष करणारा 'संघर्ष योध्दा' खंडेराव जगदाळे यांच्या कार्याचा भरभरून उल्लेख केला. जगदाळे यांच्या विविध आंदोलनामुळे विनाअनुदानित शाळेतील जवळपास साठ हजार शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन सुरू झाले आहेत. हे खऱ्या अर्थाने 'संघर्ष योध्दा' खंडेराव जगदाळे यांचे अनंत उपकार आहेत हे उपकार विसरता येणार नाहीत अशा शब्दात मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या सत्काराला उत्तर देताना 'संघर्ष योध्दा' खंडेराव जगदाळे यांनी विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शिक्षक यांची व्यथा मांडल्या. या वेळी रिटायर होण्यापूर्वी तरी किमान आम्हाला १००% मिळावे, मेडिक्लेम योजना, जुनी पेन्शन लागू करावी, १५ मार्च २०२४ संच मान्यता जाचक शासन निर्णय हा निर्णय रद्द झाला पाहीजे. सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० करावे अशी मागणी या वेळी जगदाळे यांनी केली. 'संघर्ष योध्दा' खंडेराव जगदाळे सरांच्या सत्कारा नंतर त्यांच्याबद्दल बोलताना माजी गृहमंत्री सतेज पाटील उर्फ बंटी पाटील म्हणाले की, कायम विनाअनुदानित शाळांच्या अनुदानासाठी कायम संघर्ष करणारे 'संघर्ष योद्धा' खंडेराव जगदाळे सर यांचे कार्य व संघर्ष खूप मोठा आहे. या पुढे प्रत्येक कार्यात मी सदैव त्यांच्या सोबत असेन आपले प्रश्न येणाऱ्या काळात निश्चित सोडविण्यात येतील अशी ग्वाही यावेळी माजी गृहमंत्री सतेज पाटील यांनी दिली. यावेळी शिक्षक आमदार जयंत आसगावकर, माजी शिक्षक आमदार भगवान आप्पा साळुंखे दादा लाड, राहुल पोवार, आर वाय पाटील अनिल घाटगे, कृती समितीचे मराठवाडा विभागाचे कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजीनगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, बीड जिल्हा कृती समितीचे मार्गदर्शक तथा बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण जगताप, बीड जिल्हा कृती समितीचे सुरेश कदम सर, बी बी बोराडे, सुनील पाटील,के बी पोवार, बी जी काटे, बाबा पाटील, मेजर के एम भोसले, प्रेमकुमार बिंदगे, संदीप काळे, राजशेखर म्हामाणे, अमरसिंह खांडेकर, शिवाजी कुरणे, केदारी मगदूम, सुरेखा शिंदे, नेहा भुसारी, गौतमी पाटील, जयश्री पाटील, भाग्यश्री राणे, मुक्ता मोटे, सरिता जगदाळे, यांच्यासह सातारा, सांगली, सोलापूर, औरंगाबाद जिल्ह्यातील विविध संघटना पदाधिकारी व अंशतः अनुदानित शिक्षक उपस्थित होते.



कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळण्यासाठी सदैव संघर्ष करणारे 'संघर्ष योद्धा' खंडेराव जगदाळे यांचा मराठवाडा विभागाच्या वतीने मराठवाडा विभागाचे कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजीनगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, महिला आघाडीच्या मुक्ता मोटे मॅडम, बीड जिल्हा कृती समितीचे मार्गदर्शक तथा जिल्हा मुख्याध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण जगताप, सुरेश कदम सर यांनी सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# राजस्थानी विद्यालयात प्रवेश दिन साजरा



बीड । प्रतिनिधी

येथील राजस्थानी सेवा समाज संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालय येथे आनंदी व उत्साही वातावरणात प्रवेश दिन शनिवार दि.१५ जुन २०२४ रोजी साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष विष्णूदासजी तापडिया, सचिव रामेश्वर कासट, संस्थेचे संचालक राधेश्याम कासट साहेब , शाळेच्या मुख्याध्यापक सोहनी यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शाळेत येण्याची गोडी लागावी म्हणून विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन सर्व विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी स्वागत करण्यात आले व स्वागतानंतर लगेच मान्यवरांच्या हस्ते पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक सोहनी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले आणि रोज शाळेत उपस्थित रहावे असे आवाहन त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.शासनाने सांगितलेल्या सुचने नुसार प्रत्येक शनिवारी आनंदाइ शिक्षण दप्तर विरहित शाळा चे आयोजन सुद्धा आज शनिवार असल्यामुळे शाळेमध्ये करण्यात आले होते. विविध उपक्रम विविध खेळ घेऊन आजचा दिवस कसा आनंदी होईल याकडे सांस्कृतिक प्रमुख लड्डा यांचे विशेष लक्ष यावेळी होते. यावेळी मोठ्या प्रमाणात पालक वर्ग उपस्थित होता,त्याच बरोबर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हि उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र

मंगळवार दि.१८ जून २०२४ | ६

# वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास : परळी शहरातील नियोजित चारही स्वागत कमानींचे काम तातडीने सुरू करा -पालकमंत्री धनंजय मुंडे

## मेरू पर्वत प्रदक्षिणा मार्गाचे काम २ महिन्यात होणार पूर्ण; आयुर्वेद पार्कसाठी महसूल विभाग देणार जागा - जिल्हाधिकारी

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या परळी येथील वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी २८६.६८ कोटी रुपये मंजूर असून यातून आतापर्यंत मिळालेल्या रकमेतून परळी शहरात नियोजित चार ठिकाणी स्वागत कमान उभारणे अपेक्षित असून या चारही स्वागत कमानींचे काम तातडीने सुरू करावे, असे निर्देश पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी रविवारी सायंकाळी संपन्न झालेल्या बैठकीत संबंधितांना दिले आहेत.

वैद्यनाथ मंदिराच्या भोवताली असलेल्या मेरू पर्वत प्रदक्षिणा मार्गाचे रस्ता रुंदीकरण, नाली, पेवर ब्लॉक तसेच संपूर्ण शेडच्या कामाला गती देऊन हे काम दोन महिन्यांच्या आत पूर्ण केले जावे असेही यावेळी धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले आहे.

वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्या संदर्भात पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली परळी येथील शासकीय विश्रामगृह येथे रविवारी सायंकाळी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड, ॲड. गोविंदराव फड, बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, अभियंता श्री बेंडले, आर्किटेक्ट श्री बांगड, यांसह संबंधित अधिकारी, तंत्रज्ञ आदी उपस्थित होते. लेझर लाईट शो यासह विविध इलेक्ट्रिक कामांसाठी जवळपास ६२ कोटी रुपयांच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता येत्या दोन दिवसात मिळणार असून आता त्या



### धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची बैठक; दर्शन रांग, दर्शन मंडप, पायऱ्या आदी कामांनाही मिळणार गती

कामांनाही गती देण्यात येणार असल्याची माहितीही धनंजय मुंडे यांनी दिली.वैद्यनाथ मंदिरापासून जवळच असलेल्या शासकीय २२ एकर जागेमध्ये आयुर्वेद पार्क उभारणे प्रस्तावित आहे. यासाठी संबंधित शासकीय जागा महसूल विभाग नगर परिषदेस उपलब्ध करून देईल, अशी माहिती यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती दीपा मुधोळ - मुंडे यांनी दिली. तसेच वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत निधी प्राप्त झालेली कामे कालबद्ध मर्यादेत पूर्ण करण्यात यावीत, असे सक्तीचे निर्देश देखील श्रीमती दीपा मुधोळ यांनी दिले आहेत.मंदिर परिसरातील दर्शन रांग, दर्शन मंडप, पायऱ्या यादेखील कामांना आता वेगाने पूर्ण केले जावे. तसेच हे काम उत्कृष्ट दर्जाच्या दगडामध्ये पूर्ण केले जाईल, असेही धनंजय मुंडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी मंदिरातील नंदी, त्रिशूल, कळस हे कोणत्या पद्धतीने उभारले जावे, त्यासाठी कोणता दगड वापरावा इत्यादी विषयांवर देखील चर्चा करण्यात आली.

# खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड शाळेत विद्यार्थी स्वागत सोहळा आनंदात साजरा

### शाळेच्या पहिल्याच दिवशी तब्बल १०३० विद्यार्थ्यांची उपस्थिती

दिंद्रुड प्रतिनिधी :-

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील शाळेचा आज पहिला दिवस असल्याने शाळेत आज विद्यार्थी स्वागतोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना आणण्यासाठी सजून गेलेल्या स्कुलबसने सर्वांचेच लक्ष आकर्षित केले. अनेक ठिकाणी बस चालक व वाहक यांचा पालकांच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला. विद्यार्थी



शाळेत आल्यानंतर त्यांचे औक्षण करून त्यांच्यावर पुष्पवर्षाव करण्यात आला. त्याचप्रमाणे संस्थेचे अध्यक्ष मा.दिलीपराव पारेकर साहेब यांनी आज उपस्थित विद्यार्थ्यांच्या प्रत्येक वर्गात जावून त्यांचे अभिनंदन व चर्चा केली त्यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी या वर्षात १०० टक्के उपस्थित राहण्याचा निश्चय बोलून दाखवला.

# लोकसभेतील पंकजाताईंच्या पराभवामुळे बैलगाडा शर्यत पुढे ढकलली-राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

भाजपा राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांचा लोकसभा निवडणुकीत निसटता पराभव झाला. या पराभवाने खचून काही युवकांनी आत्महत्या केल्या. अशा परिस्थितीत बैलगाडा शर्यत घेणे उचित वाटत नाही. २ जुलै दरम्यान होणारी बैलगाडा शर्यत स्थगित करून दसरा, दिवाळी दरम्यान बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले जाईल अशी माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.



मित्र मंडळाच्या वतीने भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या वाढदिवसानिमित्त २ जुलै दरम्यान शेतकरी व बैलगाडा शर्यत शौकिनांसाठी गेली दोन वर्षापासून पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले जात आहे. परंतु लोकसभा निवडणुकीत लोकनेत्या पंकजाताईंचा झालेला निसटता पराभव समर्थक व कार्यकर्त्यांच्या जिव्हारी लागल्याने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून बैलगाडा शर्यत पुढे ढकलली आहे. याची नोंद बैलगाडा शर्यत शौकीन व शेतकरी बांधवांनी घ्यावी असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

# कत्ती, कोयत्याने प्राणघातक हल्ला केल्याच्या गुन्ह्यातील आरोपींना जामीन मंजूर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

रेशन दुकानाची सतत तक्रार केल्याच्या रागातून कत्ती, कोयत्याने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील दोघा आरोपींना अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्या. एस.जे. घरत यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला. या प्रकरणात ॲड. आर.एम. धायगुडे यांनी आरोपींच्या वतीने प्रभावी युक्तिवाद केला.

सदरील प्रकरणाची थोडक्यात माहिती अशी की, ल फिर्यादी सुग्रीव शंकर पवार याने पोलीस स्टेशन परळी (ग्रा.) येथे फिर्याद




दिली की, आमच्या रेशन दुकानाबाबत परळी तहसील कार्यालयात वारंवार तक्रार का करतोस असे म्हणत त्रिंबक विठ्ठल राठोड याने सुग्रीव लय माजला आहे त्याची बघावी लागेल असे धमकावले. त्यावर तुम्ही गावचे रेशन बरोबर वाटप करा, मी इथून पुढे तक्रार करणार नाही असे मी त्यांना सांगत असताना त्या दोघांनी माझी कॉलर धरून मला लाथा बुक्क्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. मी आरडाओरडा करताच तेथे काशिनाथ सुखदेव राठोड, राजकुमार विठ्ठल राठोड हे आले. तेव्हा धर्मराज राठोड हा त्याच्या घरात जाऊन कोयता व कत्ती घेऊन आला. तेव्हा आमच्या भांडणाचा आवाज ऐकून माझा भाऊ भीमराव शंकर पवार तिथे आला. तो आमच्या भांडणाची सोडवासोडव करत असताना ◀◀ पान ३ वर

# पंकजाताई मुंडे यांनी दिला आत्महत्याग्रस्त तरूणांच्या कुटुंबाला धीर

**बीड । प्रतिनिधी**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज दुसर्या दिवशी डिघोळ अंबा आणि येस्तार येथे आत्महत्या केलेल्या तरूणांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले व धीर दिला. या तरूणांच्या परिवाराच्या मागे मी खंबीरपणे उभा राहील, त्यांचा आधार होईल अशा शब्दांत त्यांनी परिवाराला धीर दिला. दरम्यान, स्वतःला संपवू नका, तुमचा जीव हा माझा जीव समजून त्याला जपा, या निराशेतून बाहेर या असं आवाहन त्यांनी पुन्हा एकदा केलं आहे.

लोकसभेत झालेला पराभव जिव्हारी लागल्याने डिघोळ अंबा ता. अंबाजोगाई येथील पांडूरंग सोनवणे आणि येस्तार ता. अहमदपूर येथील सचिन कोंडिबा मुंडे या तरुणांनी स्वतःचे जीवन संपवले. पंकजाताई मुंडे यांनी आज या दोन्ही गावात जावून सोनवणे व मुंडे परिवाराचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला.



### डिघोळ अंबा, येस्तार येथे सोनवणे, मुंडे परिवाराचे केले सांत्वन; कुटुंबियांच्या मागे खंबीरपणे उभा राहणार

### स्वतःला संपवू नका, तुमच्या जीवातच माझा जीव आहे, निराशेतून बाहेर या

पंकजाताई पाहताच या दोन्ही कुटुंबातील सदस्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

स्वतःला संपवू नका ; तुमचा जीव हा माझा जीव

यावेळी माध्यमांशी बोलताना पंकजाताईंनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या, आत्महत्येचं हे सत्र बंद झालं पाहिजे. माझ्या स्वतःसाठी ही चांगली गोष्ट नाही. मी हिमतीने लढणारी व्यक्ती आहे, मी कधी कोणत्या गोष्टीने डगमगले नाही पण ह्या प्रकाराने प्रचंड डगमगले आहे. लोकांनी स्वतःचे प्राण देणं हे मला अपराधी वाटतं. माझी विनंती आहे, असं काही करू नका. ह्या कुंटूबाच्या मागे मी तर उभी राहणारच आहे, हा विषय सर्वांना सांगण्याचा नाही. पण आत्महत्या सारख्या गोष्टीचं मी समर्थन नाही करू शकत. आपल्या परिवाराला, लहान लेकरांना, पत्नीला वाऱ्यावर सोडून असा निर्णय कुणी घेऊ नये. तुम्हाला मला काही द्यायचं असेल तर आपल्या कामातून, कष्टातून द्या परंतू प्रत्येकाचा जीव जाणं मला तेवढंच दुःखदायक आहे. तुमचा जीव म्हणजे माझाच जीव आहे असं समजून जपा, एवढीच माझी विनंती आहे. तुम्हाला शपथ आहे माझी या निराशेतून बाहेर या असं आवाहन त्यांनी केलं.

# मोगऱ्यात शेतकऱ्यांवर निसर्ग कोपला

### ढगफुटी झाल्याने बि - बियाणे गेले वाहुन

### शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान, शेतांना तळ्याचे स्वरूप

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोगरा गाव व परिसरामध्ये शेतजक-यांवर निसर्गाने कोप दाखविला असुन रविवारच्या रात्री झालेल्या धुव्वांधार व ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेतक-यांनी पेरणी केलेले बि - बियाणे वाहुन गेले असुन प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असुन पावसाच्या पाण्यामुळे शेतास शेततळ्याचे स्वरूप आले होते.

यावर्षी चांगला पाउस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविलेला आहे. त्याप्रमाणे ७ जुन पासुन वरूणराजा कमी - जास्त प्रमाणात बरसत देखिल आहे. त्यामुळे शेतकरी सुखावला असुन बहुतांशी शेतक-यांनी पेरणी केली आहे. शहरासह तालुका परिसरात मागील दोन ते तीन दिवसांपासुन वातावरणात प्रचंड उकाडा जाणवत होता. त्यामुळे मजुर वर्गासह सर्वच गर्मीने त्रासले होते. रविरच्या मध्यरात्री सुरूवातील हलक्या स्वरूपात सुरू झालेल्या पावसाचे रूपांतर अवघ्या काळी वेळताच वादळी वा-यात व विजांच्या कडकडाटामध्ये झाले. शहरासह तालुका परिसरात वरूणराजाची दमदार बरसला तर मोग-यासह शेतशिवारामध्ये तर ढगफुटी सदृश्य पाउस झाल्याने पेरणी केलेल्या शेतजमीनी पावसाच्या पाण्याने खरडुन गेल्याने बि - बियाणे वाहुन गेले तर शेतांचे वळण फुटून देखिल नुकसान झाले आहे. ओढे, नाले तुडूंब भरून वाहले. त्यामुळे शेतक-यांचे नुकसान झाले आहे.



# धारूर येथील शिवस्मारकातील नऊ शिवप्रेमींना तात्काळ सोडा, गुन्हे मागे घ्या

### अखिल भारतीय मराठा महासंघ, जिल्हा अध्यक्ष बापुसाहेब साळुंके

बीड । प्रतिनिधी

दि १७/६/२४ रोजी पोलिस अधीक्षक यांना धारूर येथील शिवस्मारक प्रकारातील नऊ शिव प्रेमीना अटक केली त्यांना तात्काळ सुटका करा व गुन्हे मागे घ्या , धारूर येथील शिवस्मारक ३५ वर्षांपासून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज विषय जो अस्तंगत रखडलेल्या होता सर्व मावळे यांनी

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक बसवण्यात आले तरी या प्रकरणात नऊ शिवप्रेमीना तात्काळ सोडण्यात यावे नाही




तर अखिल भारतीय मराठा महासंघाच्या बीड जिल्हा वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असे अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके यांनी केले या वेळी बीड अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष आदिनाथ पिंगळे विद्यार्थी जिल्हा अध्यक्ष भागवत मस्के ,छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष युवराज मस्के देविशीग शिंदे बीड तालुका अध्यक्ष प्रकाश तात्या शिंदे बीड शहराध्यक्ष दत्ता शेळके आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# आष्टी उपसा सिंचन योजनेअंतर्गत असणाऱ्या खुंटेफळ साठवण तलावास ४०० कोटी रुपये निधी मंजूर करावा

**आष्टी । प्रतिनिधी**

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक तीन खुंटेफळ साठवण तलावास आगामी पावसाळी अधिवेशनामध्ये ४०० कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकारने करावी अशी विनंती पुरवणी मागण्याद्वारे आमदार सुरेश धस यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेल्या पत्रामध्ये कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पास शासन निर्णय दिनांक १० ११ २०२२ अनुसार द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे बीड जिल्ह्यातील आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक तीन ही योजना या प्रकल्पाचा भाग आहे बीड जिल्ह्यातील कृष्णा खोऱ्यातील भूभाग असलेला आष्टी हा तालुका आवर्जून प्रवण क्षेत्रात मोडतो



**आ. सुरेश धस यांची राज्य सरकारकडे मागणी**

शाश्वत स्वरूपाच्या पिण्याचे पाणी व जलसिंचनाच्या लाभांपासून हा भाग आज पर्यंत वंचित आहे. या योजनेची उजनी ते थेट खुंटेफळ साठवण तलाव या पाईपलाईन व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत तसेच खुंटेफळ धरणाची कामे चालू आहेत या योजनेअंतर्गत दोन गावांचे पुनर्वसन व भूसंपादन आहे या सर्व कामाचा विचार करता आष्टी उपसा सिंचन योजनेस सन २०२४ २५ मध्ये ४०० कोटी रुपयांची तरतूद होणे आवश्यक आहे अन्यथा ही कामे रखडतील असेही या पत्राद्वारे आमदार झाल्यास यांनी म्हटले आहे आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक तीन या योजनेच्या काम झाल्यास प्रथम टप्प्यात १.६८ टीएमसी मर्यादित आठ हजार १४७ हेक्टर आष्टी तालुक्यातील क्षेत्रास पाणी मिळू शकेल व त्यामुळे बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कायमस्वरूपी दुष्काळ हटवण्यास मदत होईल त्यामुळे आगामी आर्थिक वर्ष सन २०२४ २५ मध्ये कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना क्रमांक तीन या योजनेस ४०० कोटी रुपये इतका भरीव निधी उपलब्ध करण्याची विनंती पत्राद्वारे आ.सुरेश धस यांनी राज्य शासनाकडे केली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील - सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील

पुणे दि.१७ :- राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी केले.




साखर संकुल, पुणे येथे राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा व पीक कर्ज वाटपाचा आढावा घेण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार प्रविण दरेकर, सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, सहकार आयुक्त दीपक तावरे, अपर आयुक्त व विशेष निबंधक शैलेश कोतमिरे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, माजी आमदार शिवाजी कर्डीले, आमदार मानसिंगराव नाईक, विविध जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे पदाधिकारी, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय सह निबंधकउपस्थित होते.

श्री. वळसे पाटील म्हणाले, अडचणीतील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढून त्याचा अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ होण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करावा. आर्थिक अडचणीतील नागपूर आणि नाशिक या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा कृती आराखडा सादर करणे बाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. या बँकांची स्थिती सुधारण्यासाठी वेगळी योजना राबविण्याबाबत विचार करण्यात यावा. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि विकास सोसायटीच्या आर्थिक सक्षमतेच्या दृष्टीने विभागाने नियोजन करावे. विभागाच्या अधिकाऱ्यांनी नवीन विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची स्थापना करण्यासाठी प्रयत्न करावेत. आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत.

बँकांनी पात्र शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात व वेळेत पीक कर्ज वाटप करण्याची कार्यवाही करावी. वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्ज मिळाल्याबाबत संबंधित जिल्हा निबंधक सहकारी संस्था किंवा सहायक निबंधक यांनी खात्री करावी. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत असलेली प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत कार्यवाही करावी, असेही मंत्री वळसे पाटील म्हणाले.

आमदार दरेकर यांनी अडचणीत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना बाहेर काढण्यासाठी शासनाच्या वतीने भरीव तरतूद करण्यात यावी आणि याबाबत एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याबाबत सूचना केली. श्री. अनास्कर म्हणाले, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आपले व्यवहार पारदर्शक राहील, याबाबत दक्षता घ्यावी. राज्य सहकारी बँकेच्या वतीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना विश्वासात घेऊन सहकार्य करण्यात येईल, याबाबत एक योजना आखण्यात येईल. बैठकीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या आर्थिक स्थिती, पीक कर्ज वाटप, सहकारी कर्जवसुली आदी विषयाबाबत चर्चा करण्यात आली.



## पुणे जिल्हा पत्रकार संघ नवनियुक्त पदाधिकारी मेळावा व नियुक्ती प्रमाणपत्र वितरण समारंभ

**पुणे । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषद मुंबई संचलित पुणे जिल्हा पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी मराठी पत्रकार परिषदचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या आदेशानुसार मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे, पुणे विभागीय सचिव गणेश मोकाशी यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी पत्रकार परिषदेचे निवडणूक निर्णय अधिकारी सुरेश नायकवडे यांनी सर्वानुमते जाहीर केली.

सदर पुणे जिल्हा पत्रकार संघ नवनियुक्त कार्यकारणी पदाधिकारी मेळावा व नियुक्ती प्रमाणपत्र वितरण समारंभ सोमवार दि. १७ जून रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमासाठी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे, पुणे विभागीय सचिव गणेश मोकाशी ,परिषद प्रतिनिधी एम.जी. शेलार, मुंबई विभाग अध्यक्ष राजा आदाटे, सचिव दिपक कैतके हे उपस्थित होते. पुणे जिल्हा पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांसह पुणे जिल्हा पत्रकार संघ संलग्न सर्व तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्ष , सचिव व कार्यकारणी पदाधिकारी, सभासद बंधू भगिनी या कार्यक्रमास उपस्थित होते.

## पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट असोसिएशन तर्फे नवीन भारतीय न्याय संहिता (BNS) या कायदा विषयावर चर्चासत्राचे आयोजन

पिंपरीचिंचवड । प्रतिनिधी

नेहरूनगर येथील पिंपरी न्यायालयात नवीन भारतीय न्याय सहिता (BNS) या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. पूर्वीचा इंडियन पिनल कोड (IPC) या कायद्यामध्ये बदल करून शासनाने नवीन भारतीय न्याय सहिता (BNS) हा कायदा अस्तित्वात आणलेला असून या कायद्याची लवकरच अमलबजावणी केली जाणार आहे. या कायद्यामधील झालेले बदल या विषयी वकील बंधू व भगिनी यांना मार्गदर्शन व्हावे या हेतूने असोसिएशनच्या वतीने पुणे जिल्हा न्यायालयाचे सरकारी वकील ड.पी.व्ही.चौरे यांना नवीन भारतीय न्याय सहिता (BNS) या कायदा विषयी चर्चा व मार्गदर्शन करण्याकरिता निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड.प्रमिला हरीश गाडे, उपाध्यक्ष ॲड.गोरख भागवत कुंभार, जेष्ठ विधीज्ञ ॲड.मदन छाजेड, मा.अध्यक्ष ॲड.सुनिल कडूसकर, ॲड.नारायण रसाळ(नाना), ॲड.अरुण खरात(मामा), ॲड.सुरेश वायकर यांच्या हस्ते या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून लाभलेले पुणे जिल्हा सरकारी वकील ॲड. पी.व्ही.चौरे यांचा सत्कार करण्यात आला. या चर्चासत्रामध्ये ॲड.बी.के.कांबळे, ॲड.सुनील गायकवाड, ॲड.नारायण थोरात, ॲड.संगीता कुशलकर, ॲड.शीला दळवी, ॲड.संकल्पा वाघमारे, ॲड.विशाल पौळ, ॲड.जयेश वागचौरे ॲड.पल्लवी कुऱ्हाडे, ॲड.विनोद आढाव, ॲड.घोरपडे, ॲड.अजिंक्य मराठे, ॲड.सागर पोवार, ॲड.महेश गायकवाड, ॲड.मुस्ताफिज शेख, ॲड.संतोष महानवर, ॲड.संभाजी वाघमारे, ॲड.साबळे, ॲड.बनसोडे , ॲड.आशिष रोकडे इ.वकील मान्यवर सहभागी झाले होते.



## ‘यशस्विनी सन्मान पुरस्कार’ वितरण सोहळा शनिवारी

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील कृषी, साहित्य, उद्योजकता, सामाजिक, क्रीडा प्रशिक्षण आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे ‘यशस्विनी सन्मान पुरस्कार’ प्रदान करून गौरव करण्यात येणार आहे, अशी माहिती यशवंतराव चव्हाण सेंटरचे सचिव अंकुश काकडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी भारती शेवाळे, दीप्ती नाखले, मनस्विनी भिलारे उपस्थित होत्या.

काकडे म्हणाले की, हा कार्यक्रम शनिवारी (ता. २२) सकाळी ११ वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. अनु आगा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. या वेळी ‘सकाळ प्रकाशन’ निर्मित ‘महिला धोरणाची तीस वर्षे’ या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. लेखिका मीनाक्षी पाटील यांना ‘यशस्विनी साहित्य सन्मान’, कलावती सवंडकर यांना ‘यशस्विनी कृषी सन्मान’, रुक्मिणी नागापुरे यांना ‘यशस्विनी सामाजिक सन्मान’, संध्या नरे पवार यांना ‘यशस्विनी पत्रकारिता सन्मान’, राजश्री गागरे यांना ‘यशस्विनी उद्योजकता सन्मान’, तर श्रद्धा नलमवार यांना ‘यशस्विनी क्रीडा प्रशिक्षक सन्मान’ या पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे.

## आळंदीत थोडक्यात टळली पुण्यातील पोर्शे कार दुर्घटनेची पुनरावृत्ती

आळंदी : : आळंदी शहरा लगत असलेल्या वडगाव घेनंद (ता.खेड) गावच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलाने भरधाव वेगाने चारचाकी गाडी चालवत महिलेच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला यात महिला बालबाल बचावली असून या प्रकरणी सतरा वर्षीय अल्पवयीन मुलावर आळंदी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



या प्रकरणी वडगाव घेनंद येथील नाजुका रणजित थोरात यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना तीन दिवसांपूर्वी शनिवारी (दि. १५) घडली आहे. याबाबतचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने आळंदी आणि परिसरात खळबळ उडाली आहे. पुण्यात नुकतेच ताजे प्रकरण असलेल्या पोर्शे कार अपघात घटनेची ही पुनरावृत्तीच होती ती थोडक्यात टळली अशी चर्चा नागरिक करत आहेत.

आळंदी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वडगाव घेनंदमधील गणेश नगरमधे फिर्यादी नाजुका थोरात राहत आहेत. थोरात यांच्यासोबत अल्पवयीन मुलाचे पूर्वी असलेल्या भांडणाच्या रागातून हे कृत्य केले असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. अल्पवयीन मुलाने त्याच्याकडील चारचाकी कार (एमएच १४, एचडी ५७४९) जोरात चालवून नाजुका थोरात यांच्या अंगावर गाडी घातली. मात्र, थोरात बाजूला झाल्याने वाचल्या. थोडीशी दुखापत थोरात यांना झाली. हातात लाकडी दांडकेही होते. भांडणाचा प्रकार सुरू असताना सदर अल्पवयीन त्यांच्याकडील कार शंभर मीटर अंतर मागे नेली आणि पुन्हा त्याच वेगाने कार पुढे चालवून घटनास्थळी उपस्थित अन्य लोकांच्याही अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. यामधे एक वृद्ध व्यक्ती होती. यावेळी भरधाव वेगात येणारी कार पाहून लोक बाजूला झाले, अन्यथा त्यांचीही काही खैर नव्हती. कार पुढे घेऊन गेल्यानंतर या मुलाने कारच्या टपावर उभे राहून शर्ट काढला आणि थोरात यांच्याकडे पाहून शिवीगाळ करत होता. दरम्यान, जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली आळंदी पोलिस स्टेशनमध्येव सदर अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल केला आहे. संबंधित मुलाला आळंदी पोलिसांनी ताब्यात घेतले असून बाल न्यायालयाने त्याची रवानगी बाल सुधारगृहात करण्यात आली आहे.

## खडकी टर्मिनलवर दोन प्लॅटफॉर्म वाढणार; ३५ कोटींचा निधी मंजूर

**पुणे । प्रतिनिधी**

रेल्वेच्या खडकी टर्मिनलवर लवकरच दोन प्लॅटफॉर्म वाढवले जाणार आहेत. यामुळे पुणे रेल्वे स्थानकावरील रेल्वे गाड्यांचा आणि प्रवाशांचा ताण काहीसा कमी होणार आहे. प्लॅटफॉर्म वाढल्यामुळे रेल्वे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. पुणे रेल्वे स्थानकावरून दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. दिवसाला सुमारे २०० ते २३० रेल्वे गाड्यांची येथून ये-जा असते. त्यामुळे पुणे रेल्वे स्थानकावर मोठा ताण येत आहे. येथे प्रवाशांची प्रचंड गर्दी होत असून, यामुळे अनेक समस्यांना रेल्वे प्रशासनाला आणि प्रवाशांना सामोरे जावे लागत आहे.




या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासन आता रेल्वे स्थानकांवरील प्लॅट फॉर्म वाढवण्याचे नियोजन करत असून, मुंबईप्रमाणेच पुणे शहर परिसरातील स्थानके टर्मिनल म्हणून विकसित करण्यावर भर देत आहे. यानुसार रेल्वेकडून पुणे रेल्वे स्थानक परिसरातील हडपसर आणि खडकी स्थानकाचा टर्मिनल म्हणून विकास करण्याचे काम सुरू आहे. ही स्थानके आगामी काळात पूर्णपणे विकसित झाल्यास पुणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी होणार आहे. त्या दृष्टीने रेल्वेच्या पुणे विभागाकडून कामे केली जात आहेत. त्याचाच भाग म्हणून खडकी टर्मिनलवर दोन प्लॅटफॉर्म वाढवले जाणार आहेत. त्यामुळे येथील प्लॅटफॉर्मची संख्या आगामी काही दिवसांत तीन अशी असणार आहे, त्याकरिता रेल्वे प्रशासनाला (पुणे विभाग) ३५ कोटींचा निधी मंजूर झाला असून, रेल्वे बोर्डानेही या कामाला मान्यता दिली आहे. त्यानुसार येथील एका प्लॅटफॉर्मची लांबी वाढणार, तर एक नवीन प्लॅटफॉर्म तयार करण्यात येणार आहे.

## एक कोटी ३९ लाखांचा गुटखा पकडला; गुन्हे शाखेची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील नऱ्हे परिसरातील खाडेवाडी येथील एका गोडाऊनवर छापा टाकून पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने तब्बल १ कोटी ३९ लाखांचा गुटख्याचा साठा जप्त केला. यामध्ये काही कच्चा मालदेखील मिळाला आहे.

पुष्पेंद्र अकबाल सिंग (वय २७, रा. नऱ्हे, मूळ रा. उत्तर प्रदेश), सुनील पथ्थन सिंग (वय ४५, रा. नऱ्हे, मूळ. रा. उत्तर प्रदेश), मुकेश कालुराम गेहलोत (२८, रा. आंबेगाव, मूळ. रा, राजस्थान), चंदन अजयपाल सिंग (वय ३२, रा. नऱ्हे, मूळ. रा. उत्तर प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तर, आरोपींचा साथीदार नीलेश ललवानी (वय ४०, रा, नऱ्हे) याच्यावर गुन्हा दाखल असून, पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यात येत आहे. याबाबत ४२ वर्षीय पोलिस अंमलदाराने सिंहगड रोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सुरू असलेल्या अशा अवैध धंद्यांवर कारवाई करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखेकडून शहर परिसरात गस्त वाढविण्यात आली होती. दरम्यान, शनिवारी रात्री नऱ्हे भागातील खाडेवाडी येथे एका गोडाऊनमध्ये गुटख्याचा साठा असून, येथून शहर परिसरात गुटखा वितरित होत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यानुसार युनिट दोन, सामाजिक सुरक्षा विभागासह इतर पथकांनी या गोडाऊनवर छापा टाकला. त्या वेळी येथे गुटख्याचा साठा आढळून आला.

पोलिसांनी येथून ९८ लाख ८८ हजार रुपये किमतीचा २०७ पोती आरएमडी गुटखा आणि ५ लाख ७६ हजारांचा चौकीदार गुटख्याचे २० पोती गुटखा जप्त केला. येथून पोलिसांना काही कच्चा माल मिळालेला असून, पोलिसांनी जवळपास एक कोटी ३९ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गुन्हे शाखेच्या पथकाकडून रविवारीदेखील याप्रकरणी कारवाई सुरू होती. पोलिस आयुक्त अमितेश कुमार, गुन्हे शाखेचे अप्पर पोलिस आयुक्त शैलेश बलकवडे, पोलिस उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली.

## दापोडी वीज अपघातातील मृतांच्या कुटूंबीयांना महावितरणकडून प्रत्येकी ४ लाखांची मदत

दौंड । प्रतिनिधी

दापोडी (ता. दौंड, जि. पुणे) येथे सोमवारी ( ता. १७ ) वीजेचा धक्का लागून एकाच कुटुंबातील तीन व्यक्तींचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली . या दुर्घटनेमध्ये मृत्युमुखी व्यक्तींच्या वारसांना महावितरणमार्फत प्रत्येकी ४ लाखांची मदत दिली जाणार आहे.



मुळ सोलापूर जिल्ह्यातील रहिवासी असलेले भालेकर कुटुंब दापोडी (ता. दौंड) येथील सूर्यकांत महादेव अडसूळ यांचे घरी भाड्याने राहत होते. अडसूळ यांचे घराचे पाठीमागे मोकळ्या जागेत अंदाजे सहा फूट उंचीचे वीट बांधकाम व त्यावर साडेतीन फूट उंचीचे लोखंडी पत्र्याचे कंपाऊंड केलेले आहे. शेजारी असलेल्या चव्हाण यांचे घराला ज्या सर्व्हिस वायरने वीजपुरवठा होतो.ती सर्व्हिस वायर अडसूळ यांचे घरावरुन अधांतरी गेली आहे. त्याच खांबावरील एका पडेर नामक ग्राहकाची सर्व्हीस वायर खराब झाली असल्याचे आढळले. या सर्व्हिस वायरमधून सर्वच ऋख वायर मध्ये वीजप्रवाह उतरला. त्यापैकी चव्हाण यांची ऋख वायर अडसूळ यांचे पत्र्याच्या गलच्या संपर्कात आल्याने वीजप्रवाह अडसूळ यांचे पत्र्याच्या अँगलला उतरला असल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान सोमवारी सकाळी सूर्यकांत अडसूळ यांचेकडे भाड्याने राहणारे सुरेंद्र देविदास भालेकर (वय ४५) अंघोळीसाठी गेले असता पत्र्याच्या अँगलला बांधलेल्या तारेवर टॉवेल टाकत असताना त्यांना विद्युतभारीत झालेल्या तारेचा त्यांना धक्का लागला. त्यांना वाचविण्यासाठी आलेल्या मुलगा प्रसाद (वय १७) आणि पत्नी आदिका (वय ४०) यांनाही विजेचा धक्का लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. महावितरणच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिसराचा वीजप्रवाह बंद करुन विद्युत निरीक्षक कार्यालयास पंचनाम्यासाठी बोलावले. पंचनामा व शवविच्छेदन अहवाल लवकरच प्राप् होईल. तत्पूर्वी महावितरणकडून वीज अपघातामधील मयतांना प्रत्येकी चार लाख प्रमाणे मदत दिली जाणार असल्याचे महावितरणतर्फे कळविण्यात आले आहे.

## ज्येष्ठ लेखक, संशोधक कृ. पं. देशपांडे यांचे निधन

**पुणे । प्रतिनिधी**

ज्येष्ठ लेखक आणि संशोधक कृ. पं. देशपांडे (वय ८३) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

पुणे विद्यार्थीगृहाच्या महाराष्ट्र विद्यालयात अध्यापक म्हणून ते ३१ वर्षे कार्यरत होते. पर्यवेक्षक म्हणूनही त्यांनी काम पाहिले. कथा, कविता, कादंबरी, चरित्र, संशोधनात्मक लेखन, समीक्षा, शैक्षणिक साहित्य, कादंबऱ्या, कुमारवाङ्मय, ज्ञान-छंद-सांस्कृतिक, नाटिका, संगीतिका या प्रकारात त्यांनी लेखन आणि संपादन केले आहे. संपादनासह त्यांची सुमारे १३५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांना १९९१मध्ये आदर्श शिक्षक म्हणून राष्ट्रीय पुरस्काराने गौरविले होते. यासह ‘महानुभावांचे साती ग्रंथ : स्वरूप आणि समीक्षा’ या पीएच.डी. प्रबंधाला सर्वोत्कृष्ट प्रबंधाचे तीन पुरस्कार (१९७९-८०), ‘मास महिमा-आश्विन’ला उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीबद्दल महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार (१९८१-८२), पुणे महापालिका पुरस्कार (१९८३), शिक्षकोत्तम आचार्य अत्रे पुरस्कार (१९८५), ज. शां. वैद्य पुरस्कृत आदर्श शिक्षक पुरस्कार (१९९१), आदर्श शिक्षक पुरस्कार, राष्ट्रीय पुरस्कार (१९९२), पुणे विद्यार्थीगृह पुरस्कार (१९९२), साहित्यसेवेबद्दल पुणे मराठी ग्रंथालय वर्धापनदिन पुरस्कार (१९९८), निनाद, गुरुतत्त्व पुरस्कार (२०१४), असे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

## येरवड्यातील पूरस्थिती रोखण्यासाठी प्रशासन सज्ज; नाले सफाईबाबत अधिकाऱ्यांना सूचना

येरवडा : येरवडा परिसरात नुकत्याच झालेल्या जोरदार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाल्याने महापालिका प्रशासनाने केलेल्या नाले सफाईच्या दाव्याची पोलखोल झाली. या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी पूरस्थिती निर्माण झालेल्या भागाची रविवारी पाहणी केली. याबाबत तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी या वेळी संबंधित अधिकार्यांना दिल्या.



येरवडा परिसरातील कॉमर्स झोन, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, शास्त्रीनगर, येरवडा क्षेत्रीय कार्यालय परिसर, फिनिक्स मॉल परिसर, फोर पॉईंट हॉटेल परिसर तसेच वाघोली परिसरातील पाणी तुंबणार्या ठिकाणांची या वेळी पाहणी करण्यात आली. विभागीय अधिकारी किशोरी शिंदे, सहायक आयुक्त चंद्रसेन नागटिळक, सोमनाथ बनकर, डॉ. सिद्धार्थ धेंडे, डॅनियल लांडगे, मंगेश गोळे, अविनाश शिंदे, सुशीला शिंदे, रेखा चव्हाण, विशाल बोर्डे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व नागरिक या वेळी उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोसायटीमधून वाहणारा नाला बॉम्बे सापर्स या ठिकाणी बंद करण्यात आला आहे. तो तातडीने खुला करून देण्यात यावा. अग्रसेन शाळा ते कॉमर्स झोन या ठिकाणी जमा होणारे पाणी ’सर्वे ऑफ इंडिया’च्या परिसरात सोडण्यात यावे, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड ते शास्त्रीनगर चौक परिसरातील नाल्याचा प्रवाह मोकळा करून देण्यासाठी त्यावरील अतिक्रमणे तातडीने काढण्यात यावीत आदी सूचना या वेळी भोसले यांनी संबंधित अधिकार्यांना केल्या.